सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २९ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३६२ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# राज्यातील ५६० गोशाळांच्या खात्यात २५ कोटी ४४ लाखांचे अनुदान जमा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण

मुंबई, दि. २८:- राज्यातील ५६० गोशाळांच्या खात्यात देशी गोवंश परिपोषण योजनेचे २५ कोटी ४४ लाख रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने जमा करण्यात आले.



जानेवारी , फेब्रुवारी व मार्च असे ३ महिन्याचे अनुदान आहे. गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रती दिन प्रती गाय रु. ५०/- अनुदान योजनेर्गत राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६ हजार ५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत लाभार्थी गोशाळांना वितरीत करण्यात आले.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या या कार्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी राज्य गोसेवा आयोगाचे अभिनंदन केले. देशी गोवंश संवर्धन ही काळाची गरज असून, देशी गोवंशाचे संवर्धनामुळे ग्रामीण विकासाचे गतिमान होण्यास मदत होणार आहे. राज्यातील अधिकाधीक गोशाळांना या योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आयोगाच्या या कार्याला शुभेच्छा दिल्या असून, देशी गोसंवर्धनाला चालना देण्यासाठी गोसेवा आयोगाच्या माध्यमातून देशी गोवंश संवर्धनाचे सुरु असलेले काम प्रशंसनीय आहे. यामुळे देशी गोवंश संरक्षण व संवर्धन होणार असल्याचे, म्हटले आहे.

देशी गायींची उत्पादनक्षमता कमी आहे. त्यामुळे त्यांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही. तसेच भाकड - अनुत्पादक गायींचे संगोपन करणे पशुपालकांना फायदेशीर ठरत नाही. असे पुशधन गोशाळेत ठेवण्यात येतात. अशा गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणी असलेल्या गोशाळेतील गायींना ५०/- रुपये प्रती दिन गोवंश परिपोषण योजना सुरु केली आहे. ही योजना राज्यातील शेकडो गोशाळांना दिलासादायक ठरली असून, यातून आतापर्यंत ५६० गोशाळांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आल्याचे आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी सांगितले.

ऑनलाईन अनुदान वितरण प्रसंगी आयोगाचे अध्यक्ष श्री. मुंदडा, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, आयोगाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

*असे आहे योजनेचे स्वरुप*

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळांतील भारत पशुधन प्रणालीवर नोंद असलेल्या देशी गायींच्या परिपोषणासाठी प्रती दिन अनुदान देय राहिल. अनुदानाची रक्कमः रुपये ५०/- प्रती दिन प्रती देशी गाय

*अनुदान पात्रतेच्या अटी*

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था अनुदानासाठी पात्र. संस्थेस गोसंगोपनाचा कमीतकमी तीन वर्षाचा अनुभव असावा. गोशाळेत किमान ५० गोवंश असणे आवश्यक. संस्थेतील गोवंशीय पशुधनास ईअर टॅगींग करणे अनिवार्य.

ईअर टॅगिंग झालेले गोवंशीय पशुधन अनुदानास पात्र. संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

# केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर!

## महागाई भत्त्यात २ टक्क्यांची वाढ

नवी दिल्ली : केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आणि पेन्शनधारकांसाठी महागाई भत्ता २ टक्क्यांनी वाढवण्यास मंजुरी दिली आहे. यामुळे महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५५ टक्क्यांपर्यंत वाढणार आहे.



यापूर्वी जुलै २०२४ मध्ये महागाई भत्ता ५० टक्क्यांवरून ५३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला होता. आता झालेल्या वाढीमुळे सुमारे ६८ लाख कर्मचारी आणि ४२ लाख पेन्शनधारकांना या निर्णयाचा थेट लाभ मिळणार आहे.

महागाई भत्ता हा सरकारी कर्मचाऱ्यांना महागाईच्या वाढत्या दराचा सामना करण्यासाठी दिला जातो. यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन वाढत्या खर्चाशी सुसंगत राहते आणि त्यांच्या जीवनशैलीवर अतिरिक्त आर्थिक भार पडत नाही. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे लाखो कर्मचारी आणि पेन्शनधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महागाई भत्ता म्हणजे काय?

महागाई भत्ता हा एक आर्थिक लाभ आहे जो सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांना महागाईच्या प्रभावाचा सामना करण्यासाठी दिला जातो. महागाई वाढल्यास जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढतात, त्यामुळे कर्मचाऱ्यांचे राहणीमान खर्चिक होते. हा अतिरिक्त खर्च भरून काढण्यासाठी सरकार महागाई भत्ता प्रदान करते. महागाई भत्ता हा कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा एक महत्त्वाचा भाग असून, तो वाढत्या महागाईच्या वेळी आर्थिक स्थैर्य प्रदान करतो.

महागाई भत्त्याची वैशिष्ट्ये:

महागाईच्या दरानुसार वाढ - हा भत्ता नियमितपणे (सहसा सहा महिन्यांतून एकदा, जानेवारी आणि जुलै महिन्यात) वाढवला जातो. वेतनाच्या टक्केवारीत दिला जातो - DA हा कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनाच्या विशिष्ट टक्केवारीत दिला जातो.

केंद्र आणि राज्य सरकार कर्मचारी यांना लागू - केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारे त्यांच्या कर्मचाऱ्यांना हा भत्ता देतात.

पेन्शनधारकांनाही लागू - सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना (पेन्शनधारकांना)ही महागाई भत्ता मिळतो.

शहर आणि ग्रामीण भागानुसार वेगवेगळा दर - महागाईचा प्रभाव शहरांमध्ये आणि ग्रामीण भागात वेगळा असतो, म्हणून DA चा दर ठरवताना याचा विचार केला जातो.

# म्यानमार आणि थायलंडमध्ये भूकंप

म्यानमार : म्यानमार आणि थायलंडमध्ये शुक्रवार २८ मार्च रोजी सकाळी भूकंप झाला. भूगर्भतज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, म्यानमारमध्ये ७.९ रिश्टर आणि थायलंडमध्ये ७.७ रिश्टर क्षमतेचा भूकंपाचा धक्का जाणवला. या भूकंपाचे धक्के उत्तर भारतात दिल्ली, नोएडा, गाझियाबादपर्यंत जाणवले. भूकंपाचा केंद्रबिंदू म्यानमारमध्ये होता.म्यानमारमधील सागाइंग प्रांतात जमिनीपासून १० किलोमीटर खाली भूकंपाचा केंद्रबिंदू होता. अचूक सांगायचे तर सागाइंग शहराच्या १६ किलोमीटर वायव्येला १० किलोमीटर खोलीवर भूकंपाचा केंद्रबिंदू होता. भूकंपामुळे अनेक लहान - मोठ्या इमारतींची पडझड झाली. अनेक इमारती कोसळल्या. अनेकांनी रस्त्यावर येऊन मोकळ्या जागेत उभे राहून स्वतःला वाचवले.



भूकंपामुळे अनेक उंच इमारतींमधील पाण्याच्या टाक्या फुटल्या. धबधब्यातून पाणी कोसळत असते तशा प्रकारे टाकीतले पाणी वेगाने उंचावरुन जमिनीवर आले. पाठोपाठ टॉवर कोसळले किंवा त्यांची पडझड झाली. अनेक ठिकाणी नागरिक इमारतींच्या ढिगाऱ्यात दबले आहेत. पडझड झालेल्या इमारतींमध्ये अडकले आहेत. जीवितहानीची नेमकी आकडेवारी अद्याप समजलेली नाही. पण आकडा मोठा असेल अशी भीती व्यक्त होत आहे.

प्राथमिक आकडेवारीनुसार, म्यानमारमध्ये १६३ आणि थायलंडमध्ये चार जणांचा आतापर्यंत मृत्यू झाला आहे. तसेच म्यानमध्ये ३०० पेक्षा जास्त तर थायलंडमध्ये ६८ पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले आहेत. चीनमध्येही दोन जण भूकंपामुळे जखमी झाले आहेत. जखमींच्या आणि मृतांच्या आकडेवारीत वाढ होण्याची भीती व्यक्त होत आहे.

भूकंपानंतर म्यानमार आणि थायलंडमध्ये आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे. मदतकार्य सुरू आहे. थायलंडमध्ये ग्रेटर बँकॉकला भूकंपाचा मोठा फटका बसला आहे. म्यानमारमध्ये मंडाले आणि आसपासच्या शहरांना भूकंपाचा मोठा फटका बसला आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी नागपूर दौऱ्यावर

नागपूर: पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी ३० मार्च रोजी नागपूरला भेट देणार आहेत. नागपूर भेटीदरम्यान पंतप्रधानांचे ४ प्रमुख कार्यक्रम आहेत.

नागपूर दौऱ्यात मोदी सर्वप्रथम सकाळी ९ वाजता रेशीमबाग परिसरातील डॉ. हेडगेवार स्मृती मंदिर येथे दर्शन घेऊन त्यानंतर दीक्षाभूमीला भेट देतील. त्यानंतर माधव नेत्रालयातील प्रीमिअम केंद्राची पायाभरणी करतील. यावेळी पंतप्रधान एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. नियोजित कार्यक्रमानुसार रविवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास पंतप्रधानांच्या हस्ते नागपूर मध्ये माधव नेत्रालय प्रीमिअम केंद्राची पायाभरणी होणार असून त्यानंतर ते एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत.

त्यानंतर दुपारी १२:३० वाजता, ते नागपूरमधील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेड येथे लॉइटरिंग युद्धपयोगी सामग्री चाचणी तळ आणि यूएव्हीसाठी धावपट्टी सुविधेचे उद्घाटन करतील. हिंदू नववर्षानिमित्त होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रतिपदा कार्यक्रमाचे औचित्य साधत पंतप्रधान नरेंद्र मोदी डॉ. हेडगेवार स्मृती मंदिर येथे दर्शन घेतील आणि आद्य सरसंघचालकांना आदरांजली वाहतील. तसेच पंतप्रधान दीक्षाभूमीला भेट देऊन आदरांजली वाहतील.

यासोबतच पंतप्रधान माधव नेत्रालय नेत्र चिकित्सा आणि संशोधन केंद्राच्या नवीन विस्तारित इमारतीची म्हणजे माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरची पायाभरणी करतील. माधव नेत्रालय नागपूरमधील एक प्रमुख सुपर-स्पेशालिटी नेत्ररोग सेवा सुविधा केंद्र आहे. माधवराव सदाशिवराव गोळवलकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २०१४ मध्ये ही संस्था स्थापन करण्यात आली. आगामी प्रकल्पात २५० खाटांचे रुग्णालय, १४ बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) आणि १४ मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर असतील. सर्वसामान्यांना परवडणाऱ्या आणि जागतिक दर्जाच्या नेत्ररोग संबंधित सेवा प्रदान करणे आहे, हा यामागील उद्देश आहे.

पंतप्रधान नागपुरातील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडच्या दारूगोळा केंद्राला भेट देणार आहेत. नि:शस्त्र हवाई वाहनांसाठी नव्याने बांधण्यात आलेल्या १२५० मीटर लांब आणि २५ मीटर रुंद हवाई पट्टीचे आणि लोइटरिंग युद्धसामग्री आणि इतर मार्गदर्शित युद्धसामग्रीची चाचणी घेण्यासाठी प्रत्यक्ष युद्धसामग्री आणि वॉरहेड चाचणी सुविधेचे उद्घाटन करतील. नागपुरातील या कार्यक्रमांना हजेरी लावल्यानंतर ते छत्तीसगडला रवाना होतील.

# एप्रिल महिन्यातील बँक सुट्ट्यांची यादी जाहीर! वेळापत्रक पाहूनच करा सर्व काम

मुंबई : एप्रिल महिना आणि आर्थिक नव वर्षाला सुरुवात होण्यास अवघे काही दिवस शिल्लक आहेत. दरम्यान नवा महिना सुरु होण्याआधी दोन दिवसापूर्वीच आरबीआयकडून (ठइख) बँक सुट्ट्यांची यादीजाहीर करण्यात येते. त्यानुसार एप्रिल महिन्यातील बॅमक सुट्ट्यांची यादी देखील आरबीआयने जाहीर (-ळिश्र इरपज्ञ केश्रळवरू) केली आहे. या महिन्यात १२ दिवस बँका बंद असणार आहेत. त्यामुळे ग्राहकांनी वेळापत्रक पाहूनच बँकेची कामे हाती घ्या, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पाहा बँक सुट्ट्यांच्या यादी**

१ एप्रिल २०२५ मंगळवार या दिवशी व्यावसायिक बँकांच्या वार्षिक इन्व्हेंटरीमुळे या दिवशी बँका बंद राहतील., ६ एप्रिल २०२५ रविवार असून रामनवमी देखील आहे., १० एप्रिल २०२५ गुरुवार रोजी जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त या दिवशी देशभरातील बँका बंद राहतील., १२ एप्रिल २०२५ शनिवारी महिन्याचा दुसरा शनिवार असल्याने देशभरातील बँका बंद राहतील., १३ एप्रिल २०२५ रविवार या दिवशी देशभरातील बँका बंद राहतील., १४ एप्रिल २०२५ सोमवार संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरातील बँका बंद राहतील., १५ एप्रिल २०२५ मंगळवार यावेळी बोहाग बिहूमुळे कोलकाता, आगरतळा, शिमला, गुवाहाटी आणि इटानगरमधील बँका बंद राहतील., १६ एप्रिल २०२५ बुधवार दिवशी बोहाग बिहूमुळे गुवाहाटीमध्ये या दिवशी बँकांना सुट्टी., १८ एप्रिल २०२५ शुक्रवारी गुड फ्रायडे मुळे देशभरातील बँका बंद राहतील., २१ एप्रिल २०२५ सोमवारी गरिया पूजेमुळे फक्त आगरतळामधील बँका बंद राहतील., २६ एप्रिल २०२५ शनिवार हा दिवस महिन्याचा चौथा शनिवार आहे, त्यामुळे देशभरातील बँका बंद राहतील., २९ एप्रिल २०२५ मंगळवार हा दिवस भगवान श्री परशुराम जयंती आहे. त्यामुळे या दिवशी बँकांना सुट्टी असेल., ३० एप्रिल २०२५ बुधवारी बसव जयंती आणि अक्षय्य तृतीयेमुळे बेंगळुरूमध्ये बँका बंद राहतील.

## विमानतळ प्रांगणात बुद्ध मुर्तीची प्रतिष्ठापना व लोकार्पण उत्साहात

# जनकल्याणासाठी सगळ्यांचा सहयोग आवश्यक-उदय सामंत

छत्रपती संभाजीनगर,दि.२८- जनसामान्यांच्या कल्याणासाठी शासन सर्व समाज घटकांना सोबत घेऊन काम करत आहे. बुद्धा पुढे नतमस्तक होऊन जनकल्याणाच्या प्रयत्नात सगळ्यांनी सहयोग द्यावा,असे आवाहन आज उद्योग मंत्री उदय सामंत यांनी येथे केले.





येथील विमानतळाच्या प्रांगणात 'भिमता' (ईींववहळीीं खपवीीरीीळरश्र चरीौषरलीीीशीी -पव ढीरवशीी -ीलळरींळेप) या संस्थेच्या वतीने साकारण्यात आलेल्या बुद्ध मुर्तीची प्रतिष्ठापना व लोकार्पण सोहळ्यासाठी श्री.सामंत आले होते. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागासवर्ग कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे, भिमता चे अध्यक्ष मिलिंद थोरात आदी यावेळी उपस्थित होते.

प्रशिक्षण केंद्राला जागा देणार- उद्योगमंत्री सामंत

सामंत म्हणाले की, जगाला अहिंसेचा संदेश भगवान बुद्धांनी दिला. जनतेचे दुःख दुर करण्यासाठी त्यांनी खडतर तप केले. अशा या बुद्धा पुढे नतमस्तक होऊन सगळ्यांनी शासनाने समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन जे जनकल्याणाचे कार्य आरंभले आहे त्यात आपला सहयोग द्यावा. लोकांना त्रास देऊन, बदनामी करुन काहीही साध्य होत नाही. जातीवर नव्हे कर्तृत्वावर श्रेष्ठत्व ठरत असतं. शासन अशा सर्व समाज घटकांसोबत आहे. उपेक्षितांच्या कल्याणासाठी प्रयत्न करीत आहे, असे त्यांनी सांगितले. 'भिमता', संस्थेला प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी जागा देण्यासंदर्भात लवकरच मान्यता प्रदान करु अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली. तसेच 'भिमता' या संस्थेने बुद्ध मुर्ती स्थापनेसाठी केलेले प्रयत्न व संस्थेचे उद्योग क्षेत्रातील कार्य याबद्दल त्यांनी प्रशंसोद्गारही काढले.

भगवान बुद्धांचे विचार अंमलात आणा- इमाव कल्याण मंत्री सावे

सावे म्हणाले की, भगवान बुद्धांचे शांतीचे विचार प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी आपल्या सगळ्यांना प्रयत्न करायचे आहेत. येथे येणारा प्रत्येक प्रवासी शहरात येतांना या बुद्धमुर्तीकडे पाहून शांतीचे विचार घेऊन येईल. भगवान बुद्धांच्या कार्याची माहितीही याठिकाणी प्रदर्शित करावी,अशी सुचना त्यांनी केली.

विकासासाठी शांतता आवश्यक- पालकमंत्री शिरसाट

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की. बुद्ध मुर्तीचे अनावरण झाले, ही आनंदाची बाब आहे. बुद्धाचे शांती आणि करुणेच्या विचारांची प्रेरणा आपण साऱ्यांनी घ्यायला हवी. येथे येतांना या मुर्तीला वंदन करुन शांततेचा भाव मनात जागृत करुनच लोक शहरात येतील. अशी शांतता प्रस्थापित करणे हे विकासासाठी अत्यंत आवश्यक असते,असे प्रतिपादनही पालकमंत्री शिरसाट यांनी केले.

भदंत बोधीपालो महाथेरो व भिक्खु संघाच्या वतीने प्रतिष्ठापना, पूजन आणि धम्मदेसना करण्यात आली तसेच भिक्खुंना मान्यवरांच्या हस्ते चिवरदान करण्यात आले. बुद्धिस्ट इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरस अँड ट्रेडर असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष मिलिंद थोरात, सुभाष मुदगावकर, प्रवीण कुमार वसाते, सिद्धार्थ जाधव, बाळासाहेब पठारे, सूर्यकांत कोटकर, रामचंद्र पठारे, सुभाष मोरे विनोद अवसरमल, प्रमोद राऊत, संदीप केदारे आदी यावेळी उपस्थित होते. मिलिंद बागुल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

अशी आहे बुद्धमूर्ती!

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अजिंठा-वेरूळ लेण्यांमधून बौद्ध संस्कृतीचे दर्शन होते. जगभरातून येथे येणाऱ्या पर्यटकांना शहराच्या ऐतिहासिक वारशाची जाणीव व्हावी, यासाठी विमानतळावर भव्य बुद्धमुर्ती उभारण्याची कल्पना पुढे आली. 'भिमता' संघटनेच्या सदस्यांनी हा प्रस्ताव विमानतळ प्राधिकरणाकडे सादर केला. ११ जानेवारी २०२३ रोजी या प्रस्तावाला मंजुरी मिळाली. तेलंगणातील आलागट्टा येथे १५.५ फूट उंच आणि अखंड बेंगलोरी ग्रॅनाइटमध्ये अभयमुद्रा असलेली बुद्धमूर्ती तयार करण्यात आली. ही बुद्धमूर्ती ५ मे २०२३ रोजी बौद्ध पौर्णिमेच्या पवित्र दिवशी स्थानापन्न करण्यात आली होती. त्यानंतर संपूर्ण परिसराचे सुशोभिकरण करून आज लोकार्पण करण्यात आले.

# जम्मू-काश्मिरात ५ दहशतवादी ठार, ४ जवान हुतात्मा

जम्मू : जम्मू आणि काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यातील एका दुर्गम जंगली भागात झालेल्या भीषण चकमकीत ५ दहशतवादी ठार झाले असून ४ सैनिक हुतात्मा झालेत. तसेच या चकमकीत एका डीएसपीसह ५ सुरक्षा कर्मचारी जखमी झाले. यामध्ये एका पॅरा कमांडोचाही समावेश आहे.

यासंदर्भातील माहितीनुसार जैश-ए-मोहम्मदच्या पीपल्स अँटी-फासिस्ट फ्रंट या संघटने हे दहशतवादी २३ मार्च रोजी हिरानगरच्या सान्याल गावात दिसले होते. रविवारी सकाळी ८ वाजता, हिरानगरच्या राजबाग परिसरातील जुठाणाच्या अंबनाळमध्ये एका ग्रामस्थाने ५ सशस्त्र दहशतवादी पाहिले आणि पोलिसांना माहिती दिली. हे दहशतवादी बिलावरकडे जात होते. याबाबत गावकऱ्यांनी पोलिसांना सूचना दिली. त्यानंतर काही वेळातच पोलिसांचा एक ताफा घटनास्थळी पोहोचला. यावेळी दहशतवाद्यांनी स्वतःला वेढलेले पाहून गोळीबार सुरू केला.




सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मराठा महासंघाकडून खऱ्या अर्थाने जोपासला जातीय महापुरुषांचा वारसा -इकबाल पाशा

## मराठा महासंघ आयोजित इफ्तार पार्टीत एकता, सौहार्दाचा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आजघडीला अनेक राजकीय पक्ष आणि काही संघटना आपला स्वार्थ आणि मतांचे विभाजन करण्यासाठी गलिच्छ राजकारण करून तरुणाईचे माथे भडकावून मतांचे गणित जुळवीत आहे. अशा परिस्थितीत अखिल भारतीय मराठा महासंघ आणि मराठा क्रांती मोर्चापासून मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजाननिमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन करून जातीय सलोखा अबाधित ठेवण्यासह बंधुभाव, एकता आणि सौहार्दाचा संदेश देत खऱ्या अर्थाने महापुरुषांचा वारसा जोपासण्याचे काम करत आहेत, असे गौरवोद्गार ज्येष्ठ समाजसेवक इकबाल पाशा यांनी येथे बोलताना केले.

सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने मराठा महासंघाच्यावतीने गुरुवार दि. २७ मार्च रोजी गांधी चमन येथे आयोजित इफ्तार पार्टीत इकबाल पाशा बोलत होते. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, माजी उपनगराध्यक्ष शाह आलम खान, डॉ. संजय लाखे पाटील, शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख माजेद, जमाते इस्लामी हिंदचे शहराध्यक्ष शेख मुजीब, काँग्रेसचे जिलध्यक्ष शेख मेहमूद, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष



अरविंद देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, ओजस हॉस्पिटलचे डॉ. सुरजसिंह तौर, महानगरपालिकेचे अभियंता सय्यद सउद, रमेश देहडकर, पत्रकार अहमद नूर, रमेश जाधव, राजेंद्र जाधव, विजय पवार, दिनकर घेवंदे, कॉम्रेड सगीर अहमद रजवी,ड. राम गव्हाणे, जिल्हा विशेष शाखेचे कैलास जावळे, आमेर पाशा, शेख वसीम, शेख हबीब, वाजेद पठाण, शेख इब्राहिम, ड. अशपाक पठाण, फइम खान आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमात समाजातील विविध स्तरांतील मान्यवर आणि नागरिकांनी एकत्र येऊन रमजानच्या पवित्र महिन्याचे महत्त्व अधोरेखित केले व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकपर भाषणात अरविंद देशमुख म्हणाले की, भगवा आणि हिंदुत्वाचे अस्तित्व कायम ठेवून छत्रपती शिवरायांनी दिलेल्या शिकवणीनुसार अठरापगड जाती, धर्म आणि पंथाला सोबत घेऊन जाती व सलोखा कायम ठेवण्यावर मराठा महासंघाचा भर आहे. त्यानुसारच गेल्या दोन वर्षापासून इफ्तार पार्टीचे आयोजन केले जात आहे. अशा उपक्रमांमुळे समाजातील बंधुभाव अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख जाकीर यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार अशोक पडूळ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ड. शैलेश देशमुख, सुभाष चव्हाण, शुभम टेकाळे, अजय कोल्हे, किरण गरड, मंगेश चव्हाण, शेख चांद, संजय देशमुख, फैसल चाऊस, शेख शकील, फईम खान, नितीन अंभोरे, सागर पाटील, शेख गफार, करण जाधव, अजिंक्य शिंदे, सुदर्शन देशमुख, किशोर शिंदे पांडुरंग खैरे, आयुष राठोड, जाकेर खान, मनोज देवरे, बाळासाहेब देशमुख, फिरोज पठाण मराठा महासंघ, मराठा क्रांती मोर्चा, करम ए सैलानी बाबा सेवाभावी संस्था, शेख इब्राहिम मित्र मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

### धार्मिक सलोखा राखणारा स्तुत्य उपक्रम- भास्करराव आंबेकर

“ यावेळी बोलताना भास्करराव आंबेकर म्हणाले की, सद्या राज्यात धार्मिक परिस्थिती तणावाची असताना जालना शहरामध्ये सर्वधर्मीय गुण्या-गोविंदाने राहतात. याचे आदर्श उदाहरण म्हणजे मराठा क्रांती मोर्चा व मराठा महासंघ आयोजित इफ्तार पार्टी होय. जालना शहरामध्ये धार्मिक सलोखा राखण्याचे काम मराठा महासंघ आणि मराठा क्रांती मोर्चा करत आहे.

## संक्षिप्त

### शॉर्टसर्किटने दुकानाला आग



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

शहरातील जालना रोडवरील शरद पोटे यांच्या हॉटेलला तारीख २७ गुरुवार रोजी पहाटे आग लागल्याची घटना घडली होती या आगीमध्ये हॉटेलमधील साहित्य जळाल्याने हॉटेल चालकांचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी मिळाली माहिती अशी की जालना रोडवरील हॉटेलला पहाटेच्या सुमारास शॉर्टसर्किटने आग लागली. यादरम्यान कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक वैजनाथ बोराडे यांनी तात्काळ अग्निशामन दलास पाचारण केल्यानंतर आग आटोक्यात आली. या आगीमध्ये सीसीटीव्ही , फ्रीज , टीव्ही , टेबल यासह हॉटेलचे साहित्य जळाले आहे. सुदैवाने या घटनेमध्ये कुठलीही जीवितहानी झालेली नाही. या घटनेचा महसूल विभागाकडून तलाठी नितीन चिंचोले यांनी पंचनामा केला.

### टेंभुर्णी ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणामुळे गावकऱ्यांना प्यावे लागत आहे गटारीचे पाणी



**तभा/वृत्तसेवा**
**टेंभूर्णी प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणामुळे टेंभुर्णीकरांना नळाद्वारे पाणी पुरवठा केला जातो. मात्र दिनांक २६ रोजी सायंकाळी ५ वाजेला टेंभूर्णी येथील बाजार गल्लीला नळाद्वारे सोडण्यात आलेले पाणी चक्क गटारीचे होते.
यावरून टेंभूर्णी ग्रामपंचायतचा भोंगळ कारभार पुन्हा चव्हाट्यावर आला आहे.यावरून असे दिसून येते की टेंभूर्णी ग्रामपंचायतला गावकऱ्यांचे काही घेणे देणे नाही असे दिसून येते आहे. टेंभूर्णी करांना पिण्यासाठी सोडले जाणारे पाण्याची पाइपलाइन ही जागोजागी फुटलेली आहे. त्यामुळे पाइपलाइन जवळून सांडपाण्याची नाल्या आहेत. ज्याठिकाणी पाइपलाइनला गळती आहे, त्या ठिकाणाहून त्या गटारीचे पाणी हे पाइपलाइन मध्ये पास होऊन, ज्यावेळी नळाला पाणी पुरवठा केला जातो त्यावेळी सुरुवातीला चक्क गटारीचे पाणी येतं आहे. त्यामुळे टेंभुर्णी ग्रामस्थांकडून ग्रामपंचायत व कर्मचारी, पदाधिकारी यांच्या विषयी तीव्र संतापा व्यक्त केला जात आहे.

आमच्या बाजार गल्लीला सोडण्यात आलेल्या नळाद्वारे चक्क गटारीचे पाणी आले होते. सध्या ऊन्हाळ्याचे दिवस असल्याने पहिलेच दहा ते बारा दिवसांनी नळाला पाणी येत. त्यामुळे गल्लीतील काही नागरीकांच्या घरातील साठवण हौदात हे पाणी गेल्याने त्यांना पुर्णपणे ते काढून टाकावे लागले आहेत.- रियाज पठाण रहिवासी नागरिक टेंभूर्णी.

याविषयी टेंभूर्णी ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी यांनी सांगितले की, त्या गल्लीत एका घरमालकाने बोअरवेल घेतला असुन, काही घरांचे नळ कलेक्शन हे जमीनीलेवल असल्याने त्यांना द्वारे ते घाण पाणी आत पास झाल्याने हे घडले आहे.
आम्ही त्यानळधारकाला सांगुन पुढे असं घडणार नाही याची काळजी घेतली जाईल. तसेच गावातील कुठल्याही वार्डात असे काही निदर्शनास आल्यास त्वरित ग्रामपंचायला कळवावे. - जगदिश आढाव :- ग्रामविकास अधिकारी टेंभुर्णी

# परिवहन विभागाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार -मंत्री प्रताप सरनाईक

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना परिवहन विभागाच्या विविध समस्या सोडवण्यासंदर्भात आमदार अर्जुनराव खोतकर यांनी परिवहन मंत्री माननीय नामदार प्रताप सरनाईक यांना पत्र देऊन विनंती केली होती त्यानुसार दिवस२६/०३/२०२४ ला मा ना प्रतापजी सरनाईक मंत्री परिवहन महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात बैठक आयोजित केली होती. मा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आयोजित केलेल्या विशेष



बैठकीत जालना परिवहन महामंडळ, बस सेवा, प्रवासी सुविधा, बस स्थानक विकास, चालक, वाहक सुरक्षा व सुविधा व परिवहन विभागाच्या जालना शहरातील विविध ठिकाणच्या जागेचा विकास व्हावा या विषयासह इतर विषयांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा केली, यावेळी मंत्री महोदयांनी सर्व विषयावर सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच मांडलेल्या समस्यांचे निराकरण करण्याचे सुतोवाच केले. यावेळी परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांची जाफराबादला धावती भेट

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे विधान परिषद विरोधीपक्ष नेते मा.अंबादास दानवे यांनी जाफराबादला धावती भेट दिली. यावेळी तालुक्यातील पदाधिकारी व शिवसैनिकांनी त्यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.भेटी दरम्यान त्यांनी पदाधिकारी व शिवसैनिकाशी संवाद साधत अनेक विषयावर चर्चा केली. तर येणाऱ्या काळात कुठलीही अडचण आल्यास शिवसैनिक म्हणुन मी कायम तुमच्या सोबत असेल,असा विश्वास यावेळी पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिकांना दिला.

यावेळी (उध्दव बाळासाहेब ठाकरे) शिवसेनेचे रमेश गव्हाड, उत्तमराव वानखेडे, तालुका प्रमुख कुंडलिक पा मुठ्ठे शहर प्रमुख देवीसिंग बायस, दादाराव सरोदे, बाबुराव मुळे



,परमेश्वर सरोदे, समाधान सवडे, योगेश गावंदे, मोहम्मद फैसल, शेख इरफान, सुलतान कुरेशी, समीर शहा, समाधान काकडे, सुभाष परीहार, नितीन करडेल, विठ्ठल खपुटे ,विष्णू लोखंडे ,नंदू गायकवाड राजू लोखंडे विनोद जाधव याच्यासह असंख्य शिवसेना व युवासेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# संदीप आरख यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव, क्षयरोग क्षेत्रात उत्कृष्ट कार्याचा केला सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

जालना जिल्हा परिषद येथे क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल डॉ. संदीप आरख यांचा जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. जी. एम. कुंडलीकर, आयएमआयचे सदस्य डॉ. आनंद बोरीवाले उपस्थित होते
राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम जि प जालना अंतर्गत क्षयरोग क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी , कर्मचारी यांना जिल्हा क्षयरोग दुरीकरण समिती जालना यांचेमार्फत प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला जिल्हा क्षयरोग केंद्र जालना च्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध शोध मोहिमेत सक्रिय सहभाग



घेऊन, औषधोपचार करून, क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तींचे निदान करून टीबी मुक्त भारत करण्यासाठी जिल्हा परिषद जालन्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार यांचे मार्गदर्शनाखाली व डॉ. श्रीमती जयश्री भुसारे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकित्सक व डॉ. जी.एम. कुंडलीकर जिल्हा क्षयरोग अधिकारी यांचे उपस्थितीत हा सोहळा पार पडला आहे २४ मार्च जागतिक क्षयरोग दिन निमित्त उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल उपचार पथक भोकरदन अंतर्गत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रघुवीर चंदेल, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कृष्णा वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरासह तालुक्यात ही मोहीम राबविण्यात आली होती. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य केल्यामुळे जिल्हा क्षयरोग दुरीकरण समिती जालना यांचे मार्फत प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल विविध क्षेत्रातील अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी अशा विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. जिल्हा क्षयरोग नियंत्रण समिती जालना कार्यालया अंतर्गत क्षयरोग उपचार भोकरदन येथे क्षयरोगाचे निदान करण्यासाठी ग्रामीण किंवा शहरी भागातील झोपडपट्टी, वीटभट्टी आदी ठिकाणी तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आशा वर्कर स्वयंसेवक व आरोग्य कर्मचारी यांच्या मदतीने सर्वेक्षण करून क्षयरोगाचे निदान करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचीच ही उत्कृष्ट कार्याची मिळालेली पोच पावती कर्मचाऱ्यांना मिळाली व कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले

# सिद्धार्थ महाविद्यालयात जागतिक जल दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**



जागतिक जलदिनानिमित्त ग्रीन क्लब व सिद्धार्थ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २२ मार्च रोजी ग्रीन क्लब फॅकल्टी कॉर्डिनेटर प्राध्यापक मनीष बनकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षीची जागतिक थीम हिमनदी संवर्धन होती. ह्या विषयावर प्रा.मनीष बनकर यांनी जागतिक गोड्या पाण्याचा पुरवठा राखण्यात हिमनद्या महत्त्वाची भूमिका निभावतात, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर विविध तातडीच्या उपायोजना करणे गरजेचे आहे . ज्यामुळे या गोड्या पाण्याची अस्तित्व व महत्त्व टिकून राहील असे प्रतिपादन केले. तसेच जागतिक जल दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात भित्तिपत्रिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉक्टर रमेश देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी विद्यार्थ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर व वाढती लोकसंख्या या विषयावर विविध प्रकारच्या भितीपत्रिका सादर केल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.प्रदीप मिसाळ, प्रा.डॉ.निलेश भोसले, प्रा.डी .टी . तांगडे ,प्रा.डॉ .एस. पी मोहरिर, प्रा .अनिल वैद्य,श्री राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले .

# आमदार बबनराव लोणीकर यांचा दणका; ९५ गाव वॉटर ग्रीड चा पाणीपुरवठा झाला सुरळीत

## ५ लाख लोकांच्या तोंडचे पाणी बंद कराल तर खबरदार; लोणीकरांनी विधानसभा गाजवली

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके यांनी पाणीपट्टी वसुलीसाठी कुठलेही प्रयत्न न करता केवळ कागदपत्रे नोटीस बजावून १७३ गाव व ९५ गाव वॉटर ग्रीड चे पाणी बंद केले होते.

लोकप्रतिनिधी म्हणून आमदार बबनराव लोणीकर यांनी वारंवार सूचना करून देखील पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला नव्हता त्यामुळे संतप्त झालेल्या आमदार बबनराव लोणीकर यांनी थेट विधिमंडळात हा विषय मांडला १६ मार्च रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तात्काळ पाणीपुरवठा सुरू केला जाईल असे आश्वासन विधिमंडळात दिले होते परंतु रजाकरी आणि इंग्रज प्रवृत्तीच्या कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके यांनी मंत्री महोदयांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आणि पुन्हा एकदा पाणीपुरवठा बंद केला होता. आमदार बबनराव लोणीकर यच्या दणक्याने हा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.



विधिमंडळात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आश्वासन दिलेले असताना देखील कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके यांनी ९५ गाव वॉटर ग्रीडला सुरू असलेला पाणीपुरवठा बंद केला ही बाब आमदार बबनराव लोणीकर यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिली. एखाद्या मंत्र्याने सभागृहात दिलेला शब्द अधिकाऱ्यांनी न पाळणे हा त्या सभागृहाचा अवमान आहे हे बाब आमदार बबनराव लोणीकर यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी लोणीकरांच्या प्रश्नाला उत्तर देताना संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाई केली जाईल. पाच लाख लोकांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न आहे त्यामुळे जर हे पाणी बंद केले तर खबरदार गाठ माझ्याशी आहे अशा शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभा दणाणून सोडली होती.

आमदार बबनराव लोणीकरांनी पाणीपुरवठा खंडित केल्याच्या विरोधात विधानसभा अक्षरशः डोक्यावर घेतली रजाकरी व इंग्रज प्रवृत्तीच्या कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके यांना तात्काळ निलंबित करा अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली होती. पाटबंधारे विभागाने पाणीपट्टी वसुलीसाठी जनजागृती करणे गावात दवंडी देणे वर्तमानपत्रात बातम्या प्रसिद्ध करणे ग्रामसभा घेणे अशा विविध माध्यमातून जनजागृती करून पाणीपट्टी वसुली केली जाऊ शकते त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही कायम पाटबंधारे विभागाच्या सोबत आहोत परंतु रजाकरी प्रवृत्तीने पाच लाख लोकांचे पिण्याचे पाणी पाटबंधारे विभाग बंद करणार असेल तर ते होऊ देणार नाही असे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मराठी नववर्षारंभ दिनानिमित्त जिल्हा प्रशासनाचा उपक्रम बुधवारी (दि.२ एप्रिल) जिल्ह्यात 'कन्या दिन' साजरा होणार

छत्रपती संभाजीनगर,दि.२८ - जिल्ह्यात मुला-मुलींच्या असमान प्रमाणामुळे चिंतेची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मुलींच्या जन्मदर वाढविण्यासाठी आणि झउझछउ्ढ कायद्याचा व्यापक प्रसार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिलेल्या निर्देशानुसार, बुधवार दि.२ एप्रिल रोजी प्रत्येक ग्रामपंचायतस्तरावर 'कन्या दिन' साजरा करण्यात येणार आहे. याबाबत तालुका, उपविभागीय पातळीवरील अधिकाऱ्यांनी नियोजन करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जाणार आहे. 'बेटी बचाओ अभियाना'ला गती देण्यासाठी आणि मुलींच्या जन्माचे महत्त्व समाजात रुजवण्यासाठी यानिमित्त विविध उपक्रम राबवले जातील. **महत्त्व आणि उद्दिष्टे :** PCPNDT कायद्याची जनजागृती,मुलगी जन्माला यावी यासाठी समाजप्रबोधन,लिंगनिदान चाचण्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी जनजागृती, ग्रामपंचायत स्तरावर 'बेटी बचाओ' चळवळीला चालना, महिला आणि मुलींच्या सन्मानासाठी विशेष कार्यक्रम. **कार्यक्रमाचे आयोजन :** मंगळवार दि. १ एप्रिल रोजी तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि आरोग्य अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येईल. तसेच दि.३०, ३१ मार्च आणि १ एप्रिल या तारखांना गावोगावी कार्यक्रमाची पूर्वतयारी करण्यात येईल. कार्यक्रमा दरम्यान महिला आणि बालिकांच्या प्रगतीवर व्याख्याने, मार्गदर्शन सत्रे, सांस्कृतिक स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आणि महिला आरोग्यावर चर्चा यांसारखे उपक्रम राबवले जातील. विशेषतः मुलींच्या शिक्षणास चालना देणाऱ्या आणि सामाजिक योगदान देणाऱ्या महिलांचा सत्कार केला जाईल.

## सोनी सबचे कलाकार गुढी पाडव्याच्या आपल्या सुंदर आठवणी शेअर करत आहेत

गुढी पाडवा म्हणजे मराठी लोकांचे नवे वर्ष आणि विविध वैज्ञानिक, धार्मिक आणि शेतकी कारणांमुळे हा दिवस लक्षणीय असतो. या सणाच्या निमित्ताने सोनी सबवरील कलाकार सरिता जोशी, आदित्य रेडिज, सायली साळुंखे, चिन्मयी साळवी आणि जयेश मोरे आपल्या गुढीपाडव्याच्या स्मृतींना उजाळा देत आहेत आणि यंदा ते काय करणार आहेत हे देखील शेअर करत आहेत. 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत राधा काकूची भूमिका करत असलेली सरिता जोशी म्हणते, गुढी पाडव्यापासून आमचे नवे वर्ष सुरू होते. आपल्या कुटुंबसमवेत नवी सुरुवात आणि सणाचा आनंद घेण्याचा हा सण आहे. दर वर्षी या दिवशी मी पारंपरिक महाराष्ट्रीयन पोशाख करते, पूजा करते आणि सगळ्यांना आवडणारे गोड-धोड पदार्थ करते. घराबाहेर उभारलेली गुढी हे समृद्धी आणि यशाचे प्रतीक आहे. नववर्षाची सुरुवात सकारात्मक मनाने करण्याची याद ही गुढी देते. लहान असताना त्या गुढीवर घातलेल्या गाठीच्या माळेवर माझा डोळा असे. गुढी उतरवल्यानंतर आम्हाला ती मिळत असे. आजही या दिवशी सिद्धिविनायक मंदिरात दर्शन करून आल्यावर मन कृतज्ञता आणि आशेने भरून जाते. सर्वांना गुढी पाडव्याच्या शुभेच्छा - हे वर्ष सर्वांसाठी सुख, आरोग्य आणि यश घेऊन येवो! 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत दिलीप पटेलची भूमिका करणारा अभिनेता जयेश मोरे म्हणतो, मी सर्वसाधारणपणे सकाळी लवकर माझ्या कुटुंबीयांसह पूजा करतो आणि मग आम्ही सगळे मिळून न्याहारी करतो. मला हा सण खूप प्रिय आहे कारण मी लहान असताना या दिवशी श्रीखंड पुरीचा बेत असायचा. मला अशा आहे की या गुढी पाडव्याला लोक थोडा श्वास घेऊन सरलेल्या वर्षाबद्दल चिंतन करतील आणि नववर्ष कसे असावे याची कल्पना करतील. सर्वांना गुढी पाडव्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

## ओडिसी टेक्नॉलॉजीज सुरक्षित डिजिटल कम्युनिकेशन्ससाठी अद्वितीय जागतिक उपाय प्रदान

मुंबई : ओडिसी टेक्नॉलॉजीज लिमिटेड ही माहिती सुरक्षा उत्पादने आणि सेवा पुरवणारी चेन्नईस्थित सूचीबद्ध कंपनी, गेल्या तीन दशकांपासून या क्षेत्रात कार्यरत आहे. कंपनीने नुकतेच दोन नवीन सॉफ्टवेअर उत्पादने बाजारात आणली आहेत. झोर्कीसाईन मेल आणि झोर्कीसाईन स्पॉट ही उत्पादने सध्या जागतिक स्तरावर गंभीर ठरलेल्या समस्येवर उपाय देऊ शकतात. या सॉफ्टवेअरमुळे सुमारे २०० दशलक्ष ई-मेल वापरकर्ते आणि १ अब्जाहून अधिक स्मार्टफोन वापरकर्त्यांना मदत होऊ शकते. गेल्या काही वर्षांत, एक नवीन संकल्पना लोकांच्या कल्पनाविश्वात प्रस्थापित झाली आहे - 'डिजिटल अरेस्ट' . हा कायदेशीर संकल्पना नसला तरी तो लोकांच्या मनात खोलवर रुजला आहे. डिजिटल अरेस्ट स्कॅममुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, परंतु त्याचबरोबर इतर प्रकारचे डिजिटल फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. ओळख चोरी डिजिटल ब्लॅकमेल आणि खंडणी , रॅन्समवेअर हल्ले यांसारख्या घटनांमध्ये वाढ होत आहे. सुरक्षा सल्लागार आणि सॉफ्टवेअर विक्रेते त्यांच्या प्रणालीसाठी वारंवार सुरक्षा अपडेट्स जारी करत असले तरी, हे हल्ले थांबत नाहीत. ही समस्या जागतिक स्तरावर वाढत आहे. अमेरिकेत देखील नागरिकांना 'टोल टेक्स्ट' आणि इतर स्कॅमसंदर्भात फक्त सतर्कता सूचना आणि सल्ले दिले जातात, प्रत्यक्ष उपाय मात्र दिला जात नाही.

## एआय पर्सनल असिस्टंट कार एमजी एस्टर आता बनली आहे 'दि ब्लॉकबस्टर एसयूव्ही'

छत्रपती संभाजीनगर - जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने त्यांच्या एमवाई२०२५ एडिशनसह एमजी एस्टरसाठी 'ब्लॉकबस्टर एसयूव्ही' म्हणून एक धाडसी नवीन भूमिका जाहीर केली आहे. हा ब्रँडच्या ग्राहकांसाठी ऑटो-टेक मास्टरपीस आणण्याच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकणारा एक आदर्श बदल आहे - आकर्षक कार्यक्षमता, आलीशान, नावीन्य आणि तंत्रज्ञान या सर्वांचे एकाच कारमध्ये एकत्रीकरण दिसून येते. एस्टर 'ब्लॉकबस्टर एसयूव्ही' ही तिच्या एमवाई२०२५ आवृत्तीने उत्साही ग्राहक आणि त्यावर लवकर अवलंबुन रहाणाऱ्या ग्राहकांना सेवा देते. एमजी एस्टर ही आता तिच्या या क्षेत्रातील एकमेव एसयूव्ही आहे ज्यात तिच्या नवीन शाइन प्रकारासह १२.५ लाख रूपयांपेक्षा (शोरूम बाह्य) कमी किमतीत पॅनोरॅमिक सनरूफ उपलब्ध आहे. शिवाय, सिलेक्ट प्रकारामध्ये सहा एअरबॅग्ज आणि प्रीमियम आयव्हरी लेदरेट सीट्स आहेत, ज्यामुळे सुरक्षितता आणि आरामदायीपणा वाढतो. एसयूव्ही उत्साही त्यांच्या नजिकच्या जेएसडब्ल्यू एमजीमोटर इंडिया डीलरशिपला भेट देऊन 'द ब्लॉकबस्टर एसयूव्ही' ९.९९ लाख रुपयांपासून (शोरूम बाह्य) बूक करू शकतात. २०२५ एमजी एस्टर १.५ लीटर एमटीआणि सीव्हीटी आणि १.३ टर्बो एटी पॉवरट्रेनमध्ये उपलब्ध आहे.

## फर्दापूर येथे प्रिपेडमीटर न बसविण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात निवेदन देण्यात आले

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २८ फर्दापूर: सोयगाव तालुक्यातील फर्दापूर परिसरात महावितरण विभागाकडून प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.फर्दापूर येथील ग्रामस्थांनी या मोहिमेला विरोध केला आहे.स्मार्ट मीटर बसविण्यात येऊ नये म्हणून वीजग्राहकांनी ग्रामपंचायत कार्यालयाला ठराव घेण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे ग्रामसेवक व सरपंचांना केली आहे.

निवेदनात असे म्हटले आहे की, महावितरण विभागामार्फत बसवले जाणारे स्मार्ट मीटर हे गोरगरीब जनतेसाठी तणावाचे व परवडणारे नाही.स्मार्ट मीटरमुळे वेळोवेळी रिचार्ज करणे,त्याची देखभाल व दुरुस्ती करणे या गोष्टी ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसाला तसेच शेतकरी वर्गाला शक्य होणार नाही.अनेक गावांमध्ये आजही इंटरनेटची सुविधा नसल्यामुळे स्मार्ट मीटर रिचार्ज करणे शक्य होणार नाही.

म्हणून सामान्य जनतेचा विचार करून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना ठरावाद्वारे स्मार्ट मीटर बसविण्यास मज्जाव करावा व जनतेचे मानसिक,आर्थिक नुकसान थांबवावे.अशा आशयाचे निवेदन शेख युसुफ,शेख फारुक,गणेश जाधव,मोहसीन शहा,आमेर शेख,हाफिज सईद व ग्रामस्थांनी सरपंच व ग्रामसेवक यांना दिले आहे.

## छत्रपती संभाजीनगर कारागृहाला प्रधान सचिव राधिका रस्तोगी यांची भेट

छत्रपती संभाजीनगर,दि.२८ - गृह विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती राधिका रस्तोगी यांनी छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहाला गुरुवारी (दि.२७) भेट दिली. या वेळी विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) डॉ.जालिंदर सुपेकर, मध्यवर्ती कारागृह अधीक्षक धनराज गवळे तसेच वरिष्ठ तुरुंगाधिकारी उपस्थित होते.



यावेळी श्रीमती रस्तोगी यांच्या हस्ते कारागृह परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर नव्याने बांधकाम केलेल्या महिला कारागृहाच्या इमारतीची पाहणी श्रीमती रस्तोगी यांनी केली. महिला कैद्यांसाठी उपलब्ध असलेल्या ई-मुलाखत सुविधा, हेल्पलाइन, तसेच कल्याणकारी योजनांची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग कक्षाची पाहणी करून न्यायालयीन कामकाजाची माहिती घेतली. कारागृहातील सुरक्षा यंत्रणा, स्वच्छता व्यवस्थापन, आणि बंदीवासीयांना दिल्या जाणाऱ्या विविध सुविधांचा आढावा घेतला.

कारागृहातील गरीब व दुर्बल कैद्यांना न्याय मिळावा यासाठी Support to Poor Prisoner Scheme अंतर्गत आवश्यक मदत दिली जावी, असे निर्देश त्यांनी दिले.

तसेच, कारागृहातील कैद्यांना कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या योजना राबवाव्या असे निर्देश त्यांनी दिले.

## राष्ट्रवादी सांस्कृतिक विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी भगवान राऊत तर शहर जिल्हाध्यक्षपदी श्रेणिक शिंगवी यांची निवड

अहिल्यानगर (प्रतिनिधी) :- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)चित्रपट, साहित्य, कला व सांस्कृतिक विभागाच्या अहिल्यानगर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी लोककला अभ्यासक भगवान राऊत तर शहर जिल्हाध्यक्षपदी प्रसिद्ध नाट्य, मालिका, चित्रपट अभिनेते श्रेणिक शिंगवी यांची निवड करण्यात आली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस चित्रपट, साहित्य, कला व सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांच्या सहीचे पत्र अहिल्यानगर शहराचे लोकप्रिय आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या शुभहस्ते व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा कार्याध्यक्ष अभिजीत खोसे, नगरसेवक अजिंक्य बोरकर, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे जिल्हा समन्वयक शशिकांत नजन, ज्येष्ठ नेपथ्यकार अनंत रिसे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे पत्र त्यांना शासकीय विश्राम गृहात झालेल्या बैठकीत प्रदान करण्यात आले.

२७ मार्च या जागतिक रंगभूमी दिनाच्या निमित्ताने ही निवड करण्यात आली. अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील साहित्य, कला, चित्रपट, नाट्य, लोककला व सांस्कृतिक क्षेत्रातील कलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे. त्यांच्या कला गुणांचे जतन, संवर्धन करून त्यांना प्रोत्साहन, मान, सन्मान व प्रसिद्धी मिळवून देणे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत अशा सूचना आ. संग्राम भैय्या जगताप यांनी यावेळी केल्या.

भगवान राऊत यांचा गेल्या २५ वर्षांपासून नाटक, मालिका, चित्रपट, लोककला क्षेत्राचा गाढा अभ्यास असून ते सतत या क्षेत्रातील विविध उपक्रमांमध्ये सहभागी असतात. साहित्य संमेलने, नाट्य संमेलने, लोककला संमेलने, कलावंतांचे मेळावे, पुरस्कार वितरण अशा कामामध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहभाग असतो.

श्रेणिक शिंगवी हे राज्य नाट्य स्पर्धेतील विविध पुरस्कार विजेते अभिनेते असून विविध चित्रपट मालिका व नाटकांमधून त्यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. अहिल्या नगर शहर व जिल्ह्यातील सांस्कृतिक जडण घडणीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आमखेडा केंद्र सोयगाव येथील दोन विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयासाठी निवड

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ मार्च

जिल्ह्यासाठी आदर्श व्रत असलेल्या नवोदय विद्यालयात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आमखेडा येथील दोन विद्यार्थ्यां राधे गोपाल ढगे व समर्थ योगीराज सोनवणे यांची निवड झालेली आहे. ही शाळा केंद्र व तालुक्यासाठी अभिमानाची अभिनंदनीय व स्तुत्य अशी बाब आहें.हे दोघं विद्यार्थ्यांचे,पालक,वर्गशिक्षक व मुख्याध्यापक राहुल राठोड,माजी मुख्याध्यापिका समायोजनाने बदली होऊन गेलेल्या सविता पाटील,स्वाती पतींगे,कामिनी बोरसे यांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव,केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी,प्रभारी शिक्षक विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख सचिन पाटील,केंद्रीय मुख्याध्यापक झगाजी पोत्रे,व्यवस्थापन समिती अध्यक्षा जयश्री पंडित व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि केंद्रातील सर्व मुख्याध्यापक,सहशिक्षक यांनी अभिनंदन केले आहे.



राधे गोपाल ढगे



समर्थ योगीराज सोनवणे

आजपर्यंत केलेल्या कामाचे फलित म्हणजे नवोदय मध्ये पात्र झालेले आपले जिल्हा परिषद चे विद्यार्थी खरं म्हणजे आजपर्यंत असं वाटलं नव्हतं की इतक्या प्रमाणामध्ये जिल्हा परिषदेचे विद्यार्थी हे परीक्षेमध्ये पात्र होतील परंतु तुम्ही केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न शिक्षकांनी दिलेली प्रेरणा यातूनच हे साध्य झालेला आहे.मला असे वाटते की स्कॉलरशिपचा रिझल्ट ही अतिशय उत्तम लागेल.यापुढे असंच आपण निपुण महाराष्ट्र कृती कार्यक्रम यामध्येही असेच काम कराल ही मला तंतोतंत खात्री आहे.गट शिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांना जर प्रेरणा दिली तर ते निश्चित काम करतात हे यावर सिद्ध झालेले आहे.तरी आपण सर्वांना पुन्हा एकदा मिळालेल्या यशाचे मानकरी करणे योग्य वाटते. असे जयश्री चव्हाण,शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद,छत्रपती संभाजीनगर यांनी सांगितले आहे.

## विहिरीत उडी घेत कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ मार्च

साडे तीन लक्ष कर्जाचा बोजा डोक्यावर असताना उत्पन्न हाती आले नसल्याने कर्ज फेडण्याच्या विवंचनेत सोयगावच्या आमखेडा भागातील शेतकऱ्याने बुधवारी रात्री एक वाजेच्या सुमारास शेतातील विहिरीत उडी घेवुन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली आहे.महसूलने घटनेचा पंचनामा केला असून सोयगाव पोलीसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. या घटनेमुळे सोयगाव शहरात खळबळ उडाली आहे



गोपीनाथ वाळुबा मोरे (वय.४२) असे विहिरीत उडी घेत आत्महत्या केलेल्या कर्जबाजारी शेतकऱ्याचे नाव आहे. त्याच्याकडे फर्दापूर शिवरात गट क्र-१९० तीन एकर शेती आहे खरीप हंगाम हातातून गेल्या नंतर रब्बीच्या हंगामात ही उत्पन्न हाती आले नाही.त्यामुळे डोक्यावरील कर्जाचा बोजा फेडण्याच्या चिंतेत त्यांनी बुधवारी रात्री शेतातील विहिरीत उडी घेतली फर्दापूर शिवारातील शेतीवर त्यांचेकडे बँक ऑफ महाराष्ट्र,विकास सोसायटी,बंधन बँक आय.डी. एफ.सी.बँक,इंडोसन बँक या सर्व बँकांचे अंदाजे कर्ज तीन ते साडे तीन लाख रु कर्ज थकबाकी आहे उत्पन्न च हाती न आल्याने त्यांनी कर्जाची चिंतेत ही टोकाची भूमिका घेतली आहे सोयगाव ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. दिनाजी खंदारे यांनी शवविच्छेदन केले गुरुवारी सायंकाळी पाच वाजता त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मूल,एक मुलगी,सुन,नातवंडे असा परिवार आहे.

## जरंडी येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात माजी विद्यार्थी,विद्यार्थिनी ३० वर्षानंतर एकत्र

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ मार्च

तालुक्यातील जरंडी येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयातील १९९३ - १९९४ च्या बॅचमधील सर्व मित्रमंडळींनी माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष अर्जुन जाधव होते तर गणेश काळे,माधव परदेशी,दत्तू पाटील,आत्माराम हिवाळे,प्रल्हाद महाजन, मुख्याध्यापक सुभाष महाजन,सुंजाता शिंदे व महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयातील सर्व स्टाफ यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली.या कार्यक्रमासाठी १९९३ - १९९४ च्या बॅचचे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी कार्यक्रमासाठी उपस्थित होते. शाळेची सुरुवात प्रार्थनेणे झाली वर्ग भरवण्यात आला व सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनी आपली मनोगत व्यक्त केली व आपला स्वतःचा परिचय करून दिला.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थी डॉ. उल्हास पाटील,सचिन पाटील,मिलिंद पाटील,सुनील पाटील,अनिल मथुरे, चंद्रशेखर पाटील,ज्ञानेश्वर राऊत,अतुल पाटील,भास्कर निकम,श्याम पाटील,प्रमोद पाटील,उमेश शिंदे,रंजीत राजपूत,वर्षा चौधरी,रेखा गुंजाळ,शोभा पाचपोहे,करूणा चव्हाण,संगीता पाटील,अनिता पाटील,उज्वला पाटील, वंदना महाजन,लता वंजारी,नारायण राठोड,सुरेश पवार, नफिस शेख,समाधान सोनार,कैलास राठोड,देविदास पाटील,सीताराम पाटील,विनोद वाघ,वामन जाधव,अंकुश राठोड,सुनील पाटील,संदीप पाटील,लकीचंद पवार,गजानन चव्हाण,प्रेमलाल राठोड,श्रीराम राठोड,संजय ढाकरे,शमा तडवी,विष्णू पाटील,अनिल पाटील,लक्ष्मण चव्हाण,विनोद राठोड,सुनील जगताप,मिरखा तडवी,समाधान पाटील, विनायक राठोड,मच्छिंद्र राठोड,श्रावण राठोड,शंकर पाटील आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.उल्हास पाटील यांनी केले तर आभार एच.डी.शिंदे मॅडम यांनी मानले.

## फर्दापूर पोलिस स्टेशन मध्ये शांतता कमिटीची बैठक संपन्न



फर्दापूर दि २८ रामनवमी व रमजान ईद हे सण साजरे करतांना कोणीही कायदा हातात घेऊ नये तसेच कायदा भंग करण्याचा प्रयत्न केला किंवा चुकीचे वर्तन केले तर त्याच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल.यादरम्यान सोशल मीडियाचा वापर विचार पुर्वक करण्याच्या सुचना उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेश कुमार कोल्हे यांनी फर्दापूर येथे शांतता कमिटी बैठकीत दिल्या आहे.

फर्दापूर येथे गुरूवार रोजी रमजान ईद व रामनवमी निमित्त फर्दापूर पोलीस ठाण्यात शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी सिल्लोड उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेश कुमार कोल्हे उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले.ते पुढे बोलतांना म्हणाले की येणारे सण उत्सव शांततेत पार पाडा यादरम्यान कोणीही स्टेटसला वादग्रस्त फोटो व्हिडीओ ठेऊन कायदाभंग करू नये.जर कोन्ही चुकीचे वर्तन करेल व कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करेल त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. पोलीस प्रशासन सदैव जनतेच्या सोबत असल्याचे त्यांनी यावेळेस सांगितले. या वेळी फर्दापूर पोलीस ठाण्याचे सपोनि.प्रफुल्ल साबळे, विलास वराडे ,माजी सभापती उस्मान खा पठाण,जगन गव्हांडे, मुक्तार शेख,अण्णा तांगडे,फिरोज पठाण,योगेश शिंदे,शेक जाकीर,भिमराव बोराडे यांच्यासह गावातील नागरीक मोठ्या संखेने उपस्थित होते.

## श्री.स.भु. बिडकीन च्या एन सी सी युनिटची वार्षिक तपासणी संपन्न

बिडकीन दि २८ मार्च पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील एन सी सी युनिटची वार्षिक तपासणी ५० महाराष्ट्र एन सी सी बटालियनचे कमांडीग ऑफिसर कर्नल भावाप्रसाद सिंग ठाकूर यांनी केली. यावेळी त्यांच्या सोबत प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, सुभेदार कृष्णा चव्हाण एनसीसी अधिकारी बाबासाहेब सोकटकर उपस्थित होते. प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले यांनी कर्नल भावाप्रसाद सिंग ठाकूर व सुभेदार कृष्णा चव्हाण यांचा सत्कार केला.यावेळी कर्नल भावा प्रसाद सिंग ठाकूर यांनी श्री सरस्वती भुवन प्रशाला , बिडकीन एनसीसी युनिट अतिशय उत्कृष्ट व इतर युनिट साठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. एनसीसी युनिटचे काम व रेकॉर्ड पाहून कर्नल ठाकूर यांनी समाधान व्यक्त केले व याबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले व एनसीसी अधिकारी बाबासाहेब सोकटकर यांचे अभिनंदन केले.यावेळी वार्षिक प्रशिक्षण शिबीरात तसेच विविध उपक्रमात विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.यामध्ये एकांकिका स्पर्धेत सुवर्णपदक व प्रमाणपत्र मिळवलेल्या प्रचिता कळसकर, शुटींग स्पर्धेत सुवर्णपदक व प्रमाणपत्र मिळवलेल्या सुजित निळ यश सर्जे व स्पर्धेत उत्कृष्ट व नेत्रदीपक कामगिरी केल्याबददल वैष्णवी जाधव, कल्याणी पडीयाल, ऋषिकेश चौधरी यांचा कर्नल ठाकूर, सुभेदार कृष्णा चव्हाण, प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला



## ग्रामपंचायत कार्यालय फारोळा अंतर्गत दिव्यांग निधी धनादेश वाटप



बिडकीन दि.२८ मार्च पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे सरपंच सलीम महंमद पठाण ग्रामपंचायत अधिकारी आशाताई तुपे यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालय अंर्तगत २३ दिव्यांगाना दिव्यांग निधी धनादेश वाटप करण्यात आला.यावेळी उपस्थित उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण,इलियास पठाण,अशोक गोरे,अहेमद पठाण,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे,तेजस जाधव दिलीप गोरे,गणेश गायकवाड,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ आदी मोठ्या संख्येने गावकरी आदींची उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश मा. अग्रवाल मॅडम साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र.८३/२०२५

अर्जदार : १) सिताराम गिननदेव गव्हाणे वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) मच्छिंद्र गिननदेव गव्हाणे वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) भगवान गिननदेव गव्हाणे वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सुनिता भ्र. शिवाजी भंडारे, वय ४५ वर्षे, धंदा शेती रा. सुराळेगाव ता. गेवराई जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र.१ ते ४ यांनी त्यांचे विधिज्ञः ॲड. श्री. एस.के. लांडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे आपसांत नात्याने सख्ख भाऊ असुन अर्जदार क्र. ४ ही अर्जदार क्र.१ ते ३ यांची बहिण आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांचे वडील नामे गिननदेव दुलीराम गव्हाणे हे मौजे महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २७/०५/२०११ रोजी मौजे महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे तसेच अर्जदार क्र.१ ते ४ यांची आई नामे गेंदावाई गिननदेव गव्हाणे ह्या दिनांक १५/११/२०२४ रोजी मौजे महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर येथे मयत झालेल्या आहे. मयत गिननदेव दुलीराम गव्हाणे व मयत गेंदाबाई गिननदेव गव्हाणे यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदद्दीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारंस प्रमाणपत्र जारी करील. प्रकरणात पुढील तारीख ११/०४/२०२५ रोजीची आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २५/०३/२०२५ रोजी दिले आहे.

आदेशावरुन

क. लिपीक | सहा. अधिक्षक

(दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर.)

## अग्रलेख...

# 'स्वच्छ भारता'चे अस्वस्थ वर्तमान!

दूरचित्रवाणी वाहिनीवरील सेक्रड गेम्स नावाच्या एका मनोरंजन मालिकेत नवाजुद्दीन सिद्दीकीची भूमिका केलेल्या गायतोंडे नावाच्या पात्राच्या तोंडी असलेला एक संवाद मध्यंतरी प्रचंड गाजला. कचऱ्याच्या ढिगातून उभारलेल्या संपत्तीवर लोळणाऱ्या या कचरा माफियाने दहशतीच्या, राजकारणातील करामतींच्या माध्यमातून आपले साम्राज्य उभे केले आणि कचऱ्यातून संपत्ती मिळविण्याच्या धंद्यातील अनेक गूढ कंगोऱ्यांची उकल केली. शहरांमध्ये प्रचंड प्रमाणात साठणाऱ्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाचा प्रश्न सामान्य माणसाला नेहमीच छळत असतो. घराघरांमध्ये साठणारा कचरा म्हणजे उपयोगिता संपुष्टात आल्यामुळे टाकाऊ ठरलेली वस्तू अशीच सर्वसामान्य माणसाची समजूत असल्याने त्या वस्तूला काडीचीही किंमत नाही, असे मानले जात असताना कचऱ्याच्या कंत्राटाच्या जोरावर आपले साम्राज्य उभे करणाऱ्या या गायतोंडे नावाच्या पात्रास कधी कधी आपण म्हणजेच परमेश्वर असल्याचा भास होत असतो. घनकचरा व्यवस्थापनाच्या कंत्राटातून या धंद्यावर वर्चस्व मिळविण्याच्या एका संघर्षाची ही कहाणी ज्यांनी पाहिली आहे, त्यांना या धंद्यात लपलेल्या धनाच्या राशीचे गुपित समजू शकेल. कदाचित म्हणूनच, आता जेव्हा जेव्हा घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित बातम्यांतून या समस्येची सामान्यांना समजेल एवढीच बाजू समोर येते, तेव्हा त्यामागे काही राजकारण किंवा आर्थिक हितसंबंधदेखील गुंतलेले नाहीत ना, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो.

महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरातील शहरे, महानगरांतील घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाचा मुद्दा सातत्याने समोर येत असतो. ही समस्या म्हणजे शहरांच्या आरोग्यासाठी धोक्याची घंटा असल्याने, घनकचरा गोळा करून त्याची वेळीच विल्हेवाट लावण्याचे आरोग्याच्या दृष्टीने असलेले महत्त्व सर्वसामान्यांना चांगलेच कळते; त्यामागील अर्थकारण आणि धंद्याचे महत्त्व मात्र काही मोजक्यांनाच माहीत असते. महाराष्ट्राच्या २६ शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घनकचरा व्यवस्थापनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यात संपूर्ण अपयश आल्याचा थेट ठपका नियंत्रक व महालेखाकारांनी आपल्या अहवालात ठेवल्याने, घनकचरा व्यवस्थापनाच्या धंद्याला पुन्हा एकदा संशयाचा वास येऊ लागला आहे. घनकचऱ्याचे विघटन करून त्याची विल्हेवाट लावण्यात किंवा त्यावर प्रक्रिया करण्यात महाराष्ट्राच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था संपूर्ण अपयशी ठरल्या आहेत, असे हा अहवाल नमूद करतो. २०१६-१७ ते २०२१-२२ या सहा वर्षांत शहरी भागांत उघड्यावर साठलेल्या तब्बल ३४ लाख टन घनकचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे, असे या अहवालात म्हटले आहे. खरे म्हणजे, कचऱ्यापासून खत निर्मिती आणि वीज निर्मिती करून कचऱ्याचे सोने करण्याची कला अलिकडच्या विज्ञानास प्राप्त झाली आहे आणि अनेक नागरी स्थानिक स्वराज्य संस्था कचऱ्यापासून वीज निर्मिती किंवा खत निर्मिती करण्याबाबत सातत्याने चर्चा करीत आहेत. तथापि, कचऱ्यात दडलेल्या या ऊर्जेचा उपयोग करून त्याला मानवहिताची दिशा दाखविण्याबाबत मात्र फारशी उत्सुकता दाखविली जात नसल्याने जमिनीचा आणि पाण्याचा दर्जादेखील खालावल्याच्या गंभीर प्रश्नाकडे या अहवालाने अंगुलिनिर्देश केला आहे. मानवी वस्ती जसजशी विस्तारत जाते, तसतशी उपलब्ध जागेची टंचाईही वाढत जाते. वस्तीचा अनिर्बंध विस्तार होऊ लागला की, नागरी सुविधांवर ताण पडून अशा समस्या निर्माण होतात. उपयोगमूल्य नसलेल्या वस्तूंना टाकाऊ पदार्थ समजून त्या फेकून दिल्या गेल्या की, त्या वस्तूचे कचऱ्यात रूपांतर होते. यापैकी निम्म्याहून अधिक कचऱ्याचा पुनर्वापर करता येत नसल्यामुळे तो फेकूनच द्यावा लागतो. त्याची योग्य विल्हेवाट न लागल्यास तो अपायकारकही ठरतो. असा कचरा तात्पुरता किंवा दीर्घकाळ टिकणारा असल्याने, त्याचे योग्य विभाजन करून विल्हेवाट लावण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था बहुधा कंत्राटदारांचीच नियुक्ती करतात. या कचऱ्यातील टाकाऊ वस्तूंचे मोल ओळखून त्याचा धंदा करणाऱ्या टोळ्यांमधील संघर्षाच्या कहाण्या प्रसार माध्यमांतून मनोरंजनात्मक रूपे घेऊन साकारू लागल्याने, घनकचरा व्यवस्थापनामधील दिरंगाईमागेही काही धोरणे लपलेली असावीत का, अशी शंका सामान्यांच्या मनात घर करू लागली आहे. नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यामागील राजकारणाचे अनेक कंगोरे आजकाल सामान्यांना माहीत झालेले आहेत. शहरांमधील रस्त्यांवर वर्षागणीक खड्डे कसे पडतात आणि ते बुजविण्यासाठी वर्षागणीक कोट्यवधींची कंत्राटे का दिली जातात, यामागील राजकारण आणि अर्थकारण हे आजकाल गुपित राहिलेले नाही. तंत्रज्ञान आणि विज्ञानाने अचाट प्रगती केलेली असतानाही, रस्त्यावरील खड्ड्यांची समस्या कायमस्वरूपी निकाली काढण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांना यश येत नाही की त्यामध्ये रसही नसतो, याची उत्तरे आता फारशी अनाकलनीय राहिलेली नाहीत. कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न अशाच अर्थकारणाशी जोडला गेला असावा का, असा संशय करमणुकीच्या निमित्ताने लोकांचे मनरंजन करण्यासाठी रचलेल्या कथानकांमुळे अलिकडे बळावू लागला आहे. कचरा ही भारतासमोरील सर्वाधिक वेगाने वाढणारी समस्या आहे, असा निष्कर्ष 'नेचर' नावाच्या एका प्रतिष्ठित नियतकालिकाने काढला होता. अर्थात, भारतीयांस या समस्येची चांगलीच ओळख असल्याने या निष्कर्षामुळे कोणासही फारसा धक्का वगैरे बसला नव्हता. कदाचित त्यामुळेच डोळ्यादेखत दिवसागणीक फोफावणाऱ्या या समस्येचे गांभीर्य जनतेसही जाणवले नसावे आणि शहरांचे नियोजन करणाऱ्या यंत्रणांनाही या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची गरज वाटली नसावी. कदाचित त्यामुळेच पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर लाल किल्ल्यावरून केलेल्या आपल्या पहिल्याच भाषणात नरेंद्र मोदी यांनी स्वच्छतेचा नारा दिला, तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या. कचरा ही लाल किल्ल्यावरून उल्लेख करण्याएवढी मोठी बाब आहे का, असा प्रश्नही अनेकांना पडला, पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष करून 'स्वच्छ भारत'सारख्या मोहिमेस बळ दिले. ती एक लोकचळवळ व्हावी, यासाठी कार्यक्रमही आखला. आता नागरिकांची मानसिकता बदलत असून, कचरा निर्माण करण्यातील निर्ढावलेपणा हळूहळू कमी होत असल्याचे स्पष्ट होऊ लागले. असे असले, तरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उदासीनतेचे काय करायचे, हा प्रश्न नियंत्रक व महालेखाकारांनी अहवालातून उजेडात आणलेल्या वास्तवामुळे ठळक झाला आहे. राज्यातील ३४ शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यात घातक अशा जैविक कचऱ्याचाही समावेश असल्याचे उघड झाले आहे, तर २४ शहरांमध्ये गोळा होणाऱ्या घनकचऱ्यात इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या कचऱ्याची भर पडली आहे. ६४ टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांकडे तर घराघरातील रोजचा कचरा गोळा करण्याची यंत्रणा तोकडी आहे, त्यामुळे ४१ टक्के कचरा गोळादेखील केला जात नसल्याचा धक्कादायक निष्कर्ष या अहवालाने काढला आहे. असा कचरा बिनदिक्कतपणे उघड्यावर फेकला जात असल्याने शहरांचे विद्रूपीकरण होतेच; पण त्यापासून निर्माण होणाऱ्या विषारी वायूमुळे होणारे प्रदूषण हीदेखील एक गंभीर समस्या ठरते. शहरीकरणाचा वेग वाढत असल्याने नागरी भागात मोठ्या प्रमाणावर बांधकामे सुरू असतात. त्यापासून निर्माण होणाऱ्या राडारोड्याचे व्यवस्थापन तर होतच नसावे, अशी शंका अहवालाने दिलेल्या आकडेवारीमुळे उपस्थित होत आहे. आता समोर आलेल्या वास्तवाची गंभीर दखल घेऊन नागरी प्रशासन यंत्रणांनी घनकचरा व्यवस्थापनाचे व्यापक धोरण आखण्याची गरज अधोरेखित झाली आहे. कार्यक्षमता सिद्ध करा अन्यथा बाजूला व्हा, असा एक खणखणीत इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला होता. आता त्याची आठवण करून देण्याची वेळ आली आहे. कारण, केवळ सहा वर्षांत ३४ लाख टन घनकचरा केवळ २६ शहरांमध्ये उघड्यावर जमा होत असेल, तर त्याच्या व्यवस्थापनातील उदासीनता हेच महत्त्वाचे कारण असू शकते. अशा समस्या जेव्हा वर्षागणीक गंभीर होत जातात, तेव्हा कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्हे उमटणे साहजिक असते. पंतप्रधानांचा तो इशारा कदाचित संबंधितांच्या विस्मरणात गेला असेल, पण समस्यांचे वास्तव समोर आल्यानंतर सामान्य माणसास मात्र तो नक्कीच आठवला असेल, यात शंकाच नाही.

## पैलू

# गुन्हेगार राजकारणी वाढले जोमाने!

**प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

राज्यघटनेने ठरवून दिलेल्या तीन प्रमुख मंडळांमध्ये कायदेमंडळ हे महत्त्वाचे मंडळ आहे. देशात कायदे करण्याची जबाबदारी या मंडळावर असते. संसदेत खासदार तर विधिमंडळात आमदारांवर कायदे करण्याची जबाबदारी असते. असे लोकप्रतिनिधी अभ्यासू, सुशिक्षित आणि निष्कलंक असायला हवेत; परंतु सध्याची परिस्थिती पाहता किती लोकप्रतिनिधी वर उल्लेख केलेल्या तीन निकषांमध्ये मोडतात, असा प्रश्न पडतो. गुन्हेगारी रोखण्यासाठी कायदे करणारेच गुन्हेगारीच्या विळख्यात अडकत चालले आहेत. लोकप्रतिनिधी पूर्वी गुन्हेगारांची मदत घेण्यासही कचरत होते. नंतर ते गुन्हेगारांची गोपनीय मदत घ्यायला लागले. आता तर गुन्हेगारी पृष्ठभूमी असलेल्या लोकप्रतिनिधींची संख्या वाढत असून ही चिंताजनक बाब आहे. 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' (एडीआर) च्या नवीन अहवालातील आकडेवारी धक्कादायक आहे. देशातील २८ विधानसभा आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधील एकूण ४१२३ आमदारांपैकी ४५ टक्के आमदारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. आंध्र प्रदेशमधील ७९ टक्के आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. निवडणुकीच्या वेळी या आमदारांनी दाखल केलेल्या शपथपत्रांच्या आधारे ही 'एडीआर'ने हा निष्कर्ष काढला आहे. देशातील बहुतेक राज्यांमध्ये गुन्हेगारी पृष्ठभूमीचे आमदार आहेत. त्यांची टक्केवारी ४५ पर्यंत आहे. त्यांच्यावर खून किंवा खुनाचा प्रयत्न, अपहरण, महिलांसोबत गैरवर्तन यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

देशात ४०२९ आमदारांवर फौजदारी खटले प्रलंबित असतील, तर ती अत्यंत गंभीर बाब आहे. अर्थात हे पहिल्यांदाच घडत आहे, असे नाही. उमेदवारांना त्यांच्याविरुद्ध दाखल झालेले गुन्हे निवडणूक शपथपत्रात जाहीर करणे बंधनकारक करण्यात आल्यापासून समोर येणारे गुन्ह्यांचे आकडे सतत वाढत आहेत. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे अशा आमदारांची संख्या वाढत आहे असे नाही, तर लोकसभेतही ही संख्या सातत्याने वाढत आहे. एका आकडेवारीनुसार, लोकसभेच्या ५४३ सदस्यांपैकी २५१ सदस्यांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. म्हणजे गुन्हेगारी नोंदी असलेल्या लोकसभा सदस्यांची संख्या जवळपास निम्मी आहे. सत्ताधारी असो वा विरोधी पक्ष; सर्वच पक्षांच्या आमदारांचा आणि खासदारांचा त्यात समावेश आहे. सर्व पक्षांकडे ४५ ते ६६ टक्के आमदार गुन्हेगारी पृष्ठभूमीचे आहेत. यामध्ये आंध्र प्रदेश देशात अव्वल ठरले आहे. तिथे ८० टक्के आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. हीच परिस्थिती तेलंगणामध्ये आहे. गुन्हेगारी पृष्ठभूमी असलेले ६९ टक्के आमदार आहेत. यात निम्म्याहून अधिक गंभीर प्रकरणे आहेत. बिहार ६६ टक्के, महाराष्ट्र ६५ टक्के आणि तामिळनाडूमध्ये ६९ टक्के आमदार 'दागी' आहेत.

अलिकडे आणखी एक प्रश्न उपस्थित केला जात होता. न्यायालयाने शिक्षा दिली असलेल्यांना भविष्यात आयुष्यभर निवडणूक लढवण्यास बंदी घालावी, अशी मागणी होत होती. मात्र केंद्र सरकारने हे ही मान्य केले नाही. आतापर्यंत कोणत्याही गुन्ह्यात न्यायालयाने दोन वर्षांपेक्षा अधिक शिक्षा दिल्यास किमान सहा वर्षे निवडणूक लढवण्यास अपात्र घोषित केले जाईल, अशी तरतूद आहे. न्यायालयाने शिक्षा दिली असलेली व्यक्ती पक्षाची पदाधिकारीही होऊ शकत नाही. पक्ष आणि संसदीय नियमावली वेगवेगळ्या असतात. 'असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' (एडीआर) ने २८ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधील ४०९२ आमदारांच्या निवडणुकीच्या वेळी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण करून ही माहिती गोळा केली आहे.

'एडीआर'नुसार, देशातील विविध राज्यांमधील विद्यमान आमदारांकडे एकूण ७३ हजार ३४८ कोटी रुपयांची संपत्ती आहे. ही संपत्ती नागालँड, त्रिपुरा आणि मेघालय या ईशान्येकडील तीन राज्यांच्या एक वर्षाच्या एकत्रित अर्थसंकल्पाच्या समतुल्य आहे. सर्वाधिक अब्जाधीश आमदार आंध्र प्रदेशातील असून १७४ पैकी २७ आमदार अब्जाधीश आहेत. १०७ आमदारांकडे १०० ते ५०० कोटी रुपयांची संपत्ती असून १० लाख रुपयांपेक्षा कमी संपत्ती असलेले ६५ आमदार आहेत. भाजपा आमदारांकडे २६ हजार २७० कोटी रुपयांची संपत्ती आहे. इथेही भाजपा आघाडीवर आहे. सिक्कीममध्ये ३२ पैकी फक्त एका आमदारावर गुन्हा दाखल आहे.

पक्षनिहाय विश्लेषणानुसार, चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगु देसम पक्षाच्या (टीडीपी) १३४ आमदारांपैकी ८६ टक्के म्हणजे ११५ आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. याशिवाय ६१ टक्के म्हणजेच ८२ आमदारांवर गंभीर आरोप आहेत. सुमारे ३९ टक्के (१,६५३ पैकी ६३८) भाजपा आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी ४३६ जणांवरील आरोप गंभीर आहेत. काँग्रेसच्या ६४६ आमदारांपैकी ५२ टक्के (३३९) जण गुन्हेगारी पृष्ठभूमीचे असून १९४ आमदारांवर गंभीर आरोप आहेत. तामिळनाडूच्या सत्ताधारी द्रमुकच्या ७४ टक्के (१३२ पैकी ९८) आमदारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. त्यात ४२ गंभीर आरोपांचा समावेश आहे. तृणमूल काँग्रेसच्या सुमारे ४१ टक्के (२३० पैकी ९५) आमदारांवर गुन्हे दाखल असून ३४ टक्के म्हणजेच ७८ जणांवर आरोप गंभीर आहेत. त्याचप्रमाणे आम आदमी पक्षाच्या (आप) १२३ आमदारांपैकी ६९ (५६ टक्के) आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. यापैकी ३५ जण (२८ टक्के) गंभीर आरोपांचा सामना करतात.

५४ आमदारांवर खुनाचे, २२६ आमदारांवर खुनाच्या प्रयत्नाचे, १२७ आमदारांवर महिलांशी गैरवर्तनाचे गुन्हे दाखल आहेत. देशातील प्रत्येक तिसऱ्या आमदारावर खून किंवा बलात्कारासारख्या गुन्ह्याचा आरोप आहे. देशातील ११९ आमदार अब्जाधीश आहेत. यामध्ये आंध्र प्रदेशमधील सर्वाधिक १६ टक्के (२७), कर्नाटकमधील १४ टक्के (३१), महाराष्ट्रातील सहा टक्के (१८), तेलंगणामधील सहा टक्के (७), हरयाणामधील सहा टक्के (५), अरुणाचल प्रदेशमधील पाच टक्के (३) आणि दिल्लीतील ४ टक्के (३) आमदारांची संपत्ती १०० कोटींहून अधिक आहे. कर्नाटकमधील २२३ आमदारांची एकूण संपत्ती १४ हजार १७९ कोटी रुपये इतकी आहे तसेच महाराष्ट्रातील २८६ आमदारांकडे १२,४२४ कोटी तर आंध्र प्रदेशमधील १७४ आमदारांकडे मिळून ११,३२३ कोटींची संपत्ती आहे. त्रिपुराच्या ६० आमदारांकडे मिळून ९० कोटी रुपये आहेत. तेलुगु देसम पक्षाच्या १३४ आमदारांची एकूण संपत्ती ९,१०८ कोटी रुपये, ६४ अपक्ष आमदारांची एकूण मालमत्ता २,३८८ कोटी रुपये, शिवसेनेच्या ५९ आमदारांची एकूण मालमत्ता १७,७५८ कोटी रुपये तर द्रमुक आमदारांची एकूण मालमत्ता १,७५८ कोटी रुपये आहे.

## दखल

# 'बुलडोझर'भाऊ फडणवीस

**मोरेश्वर बडगे**

दंगल सांगून होत नाही. नागपुरात तर होऊच शकत नाही, या मुद्यावर सारे बिनधास्त होते. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस ज्या गावचे आहेत त्या नागपुरात दंगल कशी होऊ शकते? पण झाली. विचित्र मानसिकता आहे. एकीकडे अंतराळात नऊ महिने अडकलेल्या महिलेला सुखरूप परत आणल्याचे आपण पाहतो तर दुसरीकडे काही माणसे थडग्याखाली अस्मिता शोधत आहेत, हेही दुदैवाने आपल्याला पाहावे लागते. १७ मार्चच्या रात्री दगा झाला. शांतताप्रिय नागपूरला बट्टा लागला. तब्बल चार तास जुन्या नागपूरच्या काही भागात राडा चालला. ११ पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांना संचारबंदी लावावी लागली. यावरून दंगलीची भयावहता लक्षात यावी. पोलिसांनी दगड खाल्ले. मात्र दंगल पसरू दिली नाही याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. दंगल पूर्वनियोजित होती, असे फडणवीसांनी म्हटले. त्यावरून विरोधकांनी त्यांना टार्गेट करू पाहिले. झोपा काढता काय? म्हणाले. काहींनी हे गुप्तचर यंत्रणेचे अपयश असल्याचे म्हटले. पोलिसांनी शंभरांवर दंगलखोरांना अटक केली आहे. सीसीटीव्हीच्या आधाराने आणखी दंगेखोरांची ओळख शोधली जात आहे. या दंगलीचे घाव फडणवीसांच्या जिव्हारी लागले. साहजिक आहे. या दंगलीने बरेच काही शिकवले आहे. फडणवीसांनी तर तिसरा डोळा उघडला. दंगलीत झालेल्या नुकसानीची भरपाई दंगलखोरांची संपत्ती विकून केली जाईल, बुलडोझर फिरवला जाईल, असे फडणवीसांनी जाहीर केले. लगेच या दंगलीचा सूत्रधार फहीम खान याच्या घरावर महापालिकेने बुलडोझर फिरवला. अशा प्रकारची कारवाई उत्तर प्रदेशात पाहायला मिळते. तिकडे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ दंगेखोरांच्या घरावर बुलडोझर फिरवतात. त्यामुळे त्यांना 'बुलडोझरबाबा' म्हटले जाते. पण नागपुरात प्रथमच बुलडोझर चालला. हिंसाचारी दंगेखोरांना अद्दल घडावी, पुन्हा हातात दगड घेण्याची त्यांची हिंमत होणार नाही यासाठी असले इंजेक्शन जरूरी होते. पण त्यावरही विरोधकांनी गळे काढले. एवढेही करायचे नाही तर नेमके करायचे काय? एक लक्षात घ्या. हा बुलडोझर फहीमच्या घरावर चालला नाही, दंगेखोरांच्या मानसिकतेवर चालला आहे. यापुढे दंगा करताना दंगेखोर हजार वेळा विचार करतील. फडणवीसांना कुणी 'चाणक्य' म्हणून ओळखतो तर कुणी धर्मयोद्धा म्हणून तर कुणी कुशल प्रशासक देवाभाऊ म्हणून अभिमानाने त्यांच्याकडे पाहतो. फडणवीसांच्या बायोडाटामध्ये एक नवी ओळख जमा झाली आहे ती म्हणजे बुलडोझरबाबा.

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पी अधिवेशनाचे बुधवारी सूप वाजलं.



सद्यस्थितीत सरकारच्या खजिन्यावर ताण आला आहे. त्यामुळे अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्याकडून फार अपेक्षा नव्हती. मात्र आहे त्या स्थितीत त्यांनी समतोल बजेट दिले आहे. त्यामुळे विरोधी पक्षालाही फारशी टीका करायची संधी मिळाली नाही. विरोधकांची मोठी विचित्र अवस्था आहे. त्यांच्याकडे पुरेसे संख्याबळ नाही. आहेत त्या आमदारांनाही सरकारला कोंडीत पकडणे जमत नाही. एकेकाळी एक से एक दबंग आमदार विरोधी बाकांवर दिसायचे. एकटे छगन भुजबळ सारे सभागृह दणाणून सोडायचे. सध्या विरोधकांना संख्याबळ अनुकूल नाही. जे आहेत त्यातही काही कुंपणावर आहेत. लढणार कोण? जे मुद्दे विरोधकांनी लढायचे ते मुद्दे घेऊन महायुतीचे आमदारच लढताना अनेक वेळा दिसले. सुधीर मुनगंटीवार हे भाजपाचे ज्येष्ठ नेते. सध्या मंत्री नाहीत. पण त्यांनी मांडलेल्या विषयांना सामोरे जाताना मंत्र्यांना घाम फुटला होता. विरोधकांची 'स्पेस' सत्ता पक्षाच्या आमदारांनी खाल्ली, असे म्हणता येईल. यावेळी फडणवीसांनी विरोधकांच्या हाती कुठलेही हत्यार राहू दिले नव्हते. बीड जिल्ह्यातले सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मीक कराडला मकोकामध्ये घेऊन फडणवीसांनी विरोधकांची नखंच काढून टाकली. अजितदादांच्या राष्ट्रवादीचे वादग्रस्त मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेऊन विरोधकांची तोंडं बंद केली. बोलणार काय? शेतकरी आत्महत्या, शेतकरी कर्जमाफी, कायदा आणि सुव्यवस्था हे नेहमीचे विषय विरोधकांनी चालवले. सरकारला घेरताना विरोधकांचीच दमछाक सुरू होती. संपूर्ण अधिवेशन काळात सत्ता पक्षच जोरात दिसला. महाआघाडीमध्ये शिवसेनेकडे सर्वाधिक म्हणजे २० आमदार आहेत. त्या हिशोबाने विधानसभेतलं विरोधी पक्षनेतेपद मिळावे, अशी उबाठा म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा आग्रह होता. त्यासाठी ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव यांचे नावही महाआघाडीच्या वतीने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे देण्यात आले. अधिवेशन संपून गेले. मात्र निर्णय झाला नाही. होणारच नव्हता. कशाला पाहिजे यांना विरोधी नेतेपद? जनतेने त्यांना त्या लायकीचेही मानले नाही. १९८५ मध्ये शेकापकडे फक्त १३ आमदार होते. तरीही त्यांचे नेते दत्ता पाटील यांची विरोधी नेतेपदी निवड झाली होती. संख्याबळाचा प्रश्न नव्हता. तसा नियमही नाही. मात्र, उबाठाच्या दोघा मित्रपक्षांना भास्कर जाधव खरेच चालणार होते का? हा आतला मामला आहे. शरद पवार आणि काँग्रेस यांनी भास्कर जाधव यांचे नाव लावून धरले असते तर चित्र काही वेगळे असते. 'मी चालत नसलो तर दुसरा नेमा' इतकेही जाधव बोलले. पण पुढे काही होण्याच्या आत अधिवेशनाचे सूप वाजले. पुढच्या अधिवेशनातही भास्कर जाधव यांचे घोडे गंगेत न्हाईल, याचा भरवसा देता येत नाही. उद्धव ठाकरे यांनी एवढी कटुता वाढवली आहे की, उबाठाला जवळ करायला कोणी तयार नाही. उबाठा दिवसेंदिवस एकटा पडत चालला आहे. मात्र सुधारायला तयार नाही. बंड करून एकनाथराव शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडले हा घाव तीन वर्षे उलटूनही विसरायला उद्धव तयार नाहीत. शिंदे म्हटले की उद्धव 'गद्दार', 'खोके' बोलायला सुरू होतात. तीच रेकॉर्ड कुणाल कामरा नावाच्या एका प्रसिद्ध स्टँडअप कॉमेडियनने गाऊन आग लावली आहे. एकनाथ शिंदे यांची खिल्ली उडवणारे गाणे त्याने गायिले आणि राजकारण तापले. हे गाणे त्याने जिथे रेकॉर्ड केले तो स्टुडियो तोडफोड करून शिंदे समर्थकांनी राग काढला. कामरा याने माफी मागावी असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगून दोन दिवस झाले. हा गडी ऐकायला तयार नाही. त्याने आणखी दोन व्हिडीयो टाकून सत्ताधाऱ्यांना खाजवले आहे. आपण जे काही करतो ते अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, असा कामरा याचा दावा आहे. मात्र, त्याचे विनोद एकदम फालतू असतात. तरीही महागडी तिकिटं घेऊन कोण लोक या कामराला ऐकायला जातात, हाही आता संशोधनाचा विषय झाला पाहिजे. 'माफी मागा' सांगूनही कामरा माफी मागत नाही, याचा अर्थ त्याच्या पाठीशी विरोधकांची लॉबी आहे. कोणाची सुपारी घेऊन कुणाल कामरा नेत्यांची टिंगल उडवतो आहे? हे न समजण्याएवढे लोक बुद्धू नाहीत. उद्धव यांना आणखी एक टेन्शन आहे आणि ते भारी आहे. दिशा सालियनचे भूत बाटलीतून बाहेर आले आहे. सेलिब्रेटी मॅनेजमेंट सांभाळणाऱ्या या तरुणीचा पाच वर्षांपूर्वी घराच्या १४ व्या मजल्यावरून उडी मारल्याने मृत्यू झाला. मात्र तिच्यावर अत्याचार करून तिला फेकण्यात आले, असा दावा तिच्या वडिलांनी केला आहे. त्यासाठी आवश्यक मसाला जमवून दिशाच्या वडिलांनी हायकोर्टात धाव घेतली आहे. आदित्य ठाकरे यांचे नाव त्या पित्याने घेतले आहे. कोर्टाने केस रजिस्टर केली म्हणजे आज ना उद्या सुनावणीला येणार. काय होणार आदुबाळाचं?

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वेध

# थकित वेतनाच्या भाराने पिचल्या 'अभियांत्रिकी' संस्था!

**संजय रामगीरवार**

विदर्भातील कित्येक खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी त्यांच्या थकित वेतनासाठी न्यायालयात गेले आहेत. एकट्या चंद्रपूरच्या 'आरसीईआरटी'च्या वेगवेगणघा याचिका दार्खा आहेत. त्यातील एक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची तर तीन प्राध्यापकांच्या आहेत. आजघडीस तब्बल ९० कोटींचा दावा त्यातून करण्यात आला आहे. वर्धेच्या 'बीडीसीओई' महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या अशाच याचिकेचा निकाल लागला असून सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार वेतन व थकित देण्याचे बंधन महाविद्यालयावर आहे. गोंदियातील मनोहरभाई पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाला त्यांच्या कर्मचाऱ्यांचे जवळपास ६० ते ६५ कोटींचे थकित वेतन देण्याचा आदेश झाला आणि या एकमेव महाविद्यालयाने हे पैसे कर्मचाऱ्यांना दिलेसुद्धा; त्यानंतर लगेच महाविद्यालय बंद करून तेथे शाळा उघडली. नागपूरचे 'एलटीजेएसएस' महाविद्यालयाच्या चार प्राध्यापकांना अशाच खटल्यात न्याय मिळाला. आणखी नऊ जण कोर्टात आहेत.

जवळपास ३० वर्षांपूर्वी मोजक्याच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या मांदियाळीत काही खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांचा समावेश झाला. अल्पावधीत त्यांना पसंतीही मिळाली. त्यामुळे राज्यात अशा ३५० पेक्षा जास्त खाजगी महाविद्यालयांना अचानक पेव फुटले. अतिउत्साही संस्थाचालकांनी एकीकडे प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची बोळवण केली तर दुसरीकडे शिक्षण शुल्क समितीचीही दिशाभूल केली. प्रतिविद्यार्थी अधिकचा खर्च दाखवून शुल्क वाढवून घेतले; प्रत्यक्षात कर्मचाऱ्यांना कमी वेतन दिले. असा हा उद्योग अव्याहत सुरू राहिला. तेव्हा या संस्थाचालकांना हे कळलेच नाही की, शिक्षण शुल्क समितीला खरी परिस्थिती विशद केली असती तर प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या हक्काचे वेतन गृहीत धरूनच शुल्क निश्चिती झाली असती. पण लाभाच्या हव्यासापोटी असेच चालत राहिले आणि मग जेव्हा प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी आवाज उठवला तेव्हा संस्थाचालकांना आपल्या खिशातून पैसे देणे कठीण झाले. कारण ही रक्कम एव्हाना कोट्यवधींच्या घरात गेली होती. शेवटी हात वर करण्यापलीकडे त्यांच्याकडे मार्गच उरला नाही आणि मग महाविद्यालये बंद करण्याची भाषा झाली. त्यावरही न्यायालयाने फटकारले. औरंगाबादच्या 'जेएनईसी' महाविद्यालयाचे प्रकरण असेच आहे. कॉलेज बंद करायचा पर्याय थकित वेतन न देण्याचे 'टुल' म्हणून वापरू नका, असे न्यायालयाने म्हटले.






एआयसीटीई आणि राज्य शासनाचा तंत्र शिक्षण विभाग गेल्या तीन दशकांपासून हे स्पष्टपणे सांगत आले की, खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी, औषधी निर्माण व व्यवस्थापन अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राध्यापकांना शासन नियमानुसार वेतन दिले पाहिजे. याचाच आधार घेत बऱ्याच महाविद्यालयांतील प्राध्यापक व कर्मचारी न्यायालयात दाद मागत आहेत. असे जवळपास २८० याचिका राज्यभरात प्रलंबित आहेत. नव्याने तयार झालेल्या खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयाने मात्र यावर उपाय शोधत आपल्या प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे 'अप्रुअल'च घेतले नाही. 'अप्रुअल' घेतल्याशिवाय त्यांची याचिका टिकत नाही, हे त्यांना माहीत होते.

चंद्रपूरच्या 'आरसीईआरटी' महाविद्यालयातील कर्मचारी व प्राध्यापकांच्या अशाच मुद्यांवर तीन प्रकरणे उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सुरू आहेत. त्यापैकी दोन प्रकरणांत न्यायालयाने तंत्र शिक्षण संचालक कार्यालयाला २००६ पासून २०१६ व २०१६ पासून २०२२ असे १६ वर्षांचे सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या निकषानुसार किती वेतन देय आहे व महाविद्यालयाने किती दिले, वेतनातील फरक किती असा सर्व हिशेब मागितला असून दोन याचिकाकर्त्यांचे एकूण थकबाकीचे आकडे न्यायालयाला व संबंधितांना दिले गेले आहेत. याचिकाकर्त्यांचे म्हणणे असे आहे की, जे वेतन महाविद्यालयाने ठरवले होते तेदेखील २०१७ पासून पूर्णपणे दिलेले नाही. दरवर्षी कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील आयकर भरायचे आणि शिक्षण शुल्क समितीला असे दाखवायचे की, पूर्ण वेतन दिले आहे. अशा या 'मॉडल'वर राज्यातील अनेक खाजगी विनानुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांचा डोलारा उभा आहे. एक एक करून अनेक महाविद्यालयांचे कर्मचारी जेव्हा न्यायालयात जातील, तेव्हा हा प्रचंड मोठा आर्थिक भार घेऊन या संस्था जगतील कशा, हा कळीचा मुद्दा आहे.

९८८१७१७८३२

### उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची पातळी कायम ठेवा



सध्या उन्हाळा चांगलाच जाणवू लागला आहे. त्यामुळे सतत घाम येतो. या सततच्या घामामुळे शरीरातील केवळ पाण्याचे प्रमाण कमी होत नाही तर शरीरातील क्षारही कमी होतात. त्यामुळे तापातदेखील डॉक्टर नेहमी सल्ला देतात की, भरपूर पाणी आणि ओआरएस प्या. एसीत दिवसभर राहिल्याने घाम वगैरे येत नाही. पण नैसर्गिक तहान कमी होते. त्यामुळे शरीरावर विपरीत आणि दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात, असे तज्ज्ञ सांगतात. बरेचदा उन्हाळ्यात चक्कर आल्यासारखे वाटणे, तोंड, घसा कोरडा पडणे, थकल्यासारखे वाटणे अशा समस्या येतात. तेव्हा शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्याची शक्यता असते. अशा वेळेस शरीरातून गेलेले पाणी आणि क्षार भरून काढण्याचा प्रयत्न करावा आणि डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. तज्ज्ञ सांगतात कडक उन्हाळ्यात त्रास टाळायचा असेल तर केवळ पाणी पिऊन चालत नाही, याच्या जोडीला कैरीचे पन्हे, ताक, कोकम, लिंबुयुक्त फळांचे सरबत, उसाचा रस, नारळ पाणी हे द्रवयुक्त पदार्थ प्यावे. तसेच टरबूज, खरबूज, संत्री, मोसंबी, आंबा या फळांचा आहारात समावेश करावा. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे घरच्या बाहेर पडताना थोडे खाऊन निघावे आणि सोबत पाण्याची बाटली ठेवावी.


**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

●● ●●

## वाचक पत्रे

### नाशिक कुंभमेळ्याची तयारी करताना सोयी करा

नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी ११०० कोटींचा आराखडा ही बातमी समाधानकारक आहे. दोन महिन्यांपूर्वी प्रयागराजमध्ये महिनाभर चालणाऱ्या कुंभमेळ्याचे आयोजन खूप गाजले. असंख्य लोकांनी तिथे हजेरी लावली होती. उत्तरप्रदेश सरकारने तिथे ज्याप्रमाणे व्यवस्था व आयोजन केले, त्यात काही गोष्टी वगळता लोकांनी कौतुक केले होते.



पुढच्या दोन वर्षांनी नाशिकला कुंभमेळा होणार असून त्याची आतापासूनच तयारी करणे गरजेचे आहे. मात्र काही दिवसांपूर्वीच त्र्यंबकेश्वर मंदिर व आजूबाजूचा परिसरात गेल्यावर येथे अस्वच्छता, नीटनेटकेपणाचा अभाव व मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे बघितले. भाविक परगावातून मोठ्या संख्येने येथे येतात. मात्र पुरेशी व्यवस्था दिसत नाही. पादत्राणे ठेवण्याची व्यवस्था व मौल्यवान वस्तू ठेवायची पुरेशी सोय नाही. परिणामी काही लोक रस्त्याच्या किनारी भिंतीला लागून चपलांचा ढीग लावतात. शिवाय वाहनस्थळांची जागा अपुरी वाटते. मंदिराच्या जुन्या वास्तू प्रवेशद्वाराच्या जवळचा मार्ग फार अरुंद आहे. त्यामुळे दर्शनाला फार वेळ लागतो. शासनाने देवस्थान ट्रस्टला विश्वासात घेऊन मंदिराचे प्रवेशद्वार मोठे होऊ शकते का यासाठी प्रयत्न करावा. मंदिर प्रवेश होण्यापूर्वी येथे प्रतीक्षालयाची तीन सभागृहे आहेत. जिथे शेगावसारखीच स्टीलची बाके लावली आहेत. मात्र या बाकाखाली कुत्रे असतात. देवस्थान ट्रस्टला विनंती आहे की, सद्यस्थितीत शासनाच्या मदतीने स्वच्छता व भाविकांच्या सोयीसाठी जास्तीत जास्त जे करता येईल त्याकडे लक्ष द्यावे.

**अमोल पाठक**/पुणे

●● ●●

### खासदारांचे पगार, भत्ते वाढ ईपीएस-९५ पेन्शनर्सना चपराक

ईपीएस-९५ पेन्शनर्स मागील अनेक वर्षांपासून पेन्शनवाढीसाठी संघर्ष करीत आहेत. तुटपुंज्या पेन्शनमध्ये म्हणजे केवळ हजार-दोन हजारांमध्ये, ज्याला महागाई भत्त्याची जोड नाही, वैद्यकीय सुविधा नाही, किमान ५०००-७५०० तरी करावी म्हणून संघर्ष करणारे लाखो पेन्शनर्स, संघटना, मजदूर संघटना काही आमदार, खासदार, सरकारला निवेदने, विनंती, धरणे, आंदोलने करून थकले, कोणी ऐकले नाही. परंतु खासदारांना विनासायास त्यांचे पगार, पेन्शन, भत्ते काहीही संघर्ष, आंदोलने, मागण्या न करता रातोरात वाढवून मिळतात. निवडून येण्यापूर्वी आर्थिकदृष्ट्या कमजोर असलेली व्यक्ती खासदार होताच अल्प काळातच कोट्यधीश होते व तरीही अनेक सुविधांचा लाभ मिळत असतानादेखील अशाप्रकारे पगार, भत्ते, पेन्शन वाढीचा लाभ घेते. माझ्या मते ईपीएस-९५ पेन्शनधारकांच्या जखमेवर मीठ चोळले गेल्याचे उदाहरण आहे. त्यांच्या रास्त मागण्यांवर चपराक आहे.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या कार्याध्यक्षपदी करण गायकवाड यांची निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ जयंती उत्साहात साजरी करण्यात येणार असून या निमित आयुक्त धैर्यशील जाधव यांच्या मार्गदर्शनाखालीनूतन कार्यकारिणीत निश्चित करण्यात आली . या कार्यकारणीत कार्याध्यक्षपदी करण गायकवाड, उपाध्यक्षपदी विनय ठाकूर, कोषाध्यक्षपदी बाशित खान, सचिवपदी विश्वनाथ गोबाडे, सहसचिवपदी कुंडलिक मुजमुले, स्वागताध्यक्षपदी नासिर खान, मुख्य समन्वयकपदी अभिजीत कुलकर्णी व सुनील भराडे तर नियंत्रकपदी विशाल उफाडे, नियोजन समितीपदी गौतम वडमारे, कांगडा, रोहित प्रधान, सौरभ सूर्यवंशी, न्यायरत्न घुगे, राजू झोडपे, महिला समन्वयक ज्योती मोरे, शीला गायकवाड, सुनीता घोगरे यांची निवड करण्यात आली . १४ एप्रिल रोजी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात बुध्द वंदना झाल्यानंतर सर्व बौद्ध उपासक-उपासिका यांना अल्पोपहार महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वतीने देण्याचे नियोजन करण्यात आले . , जयंती नंतर काही दिवसांनी भीम गीत रजनी चे आयोजन करण्यात आलेले

### जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यासह एकजण चतुर्भूज- दीड लाखांचे लाच प्रकरण

**परभणी,/प्रतिनिधी :** कामांच्या थकीत बिलांच्या मंजूरीकरीता सुमारे दीड लाख रुपयांची लाच स्विकारणाऱ्या वादग्रस्त जिल्हा क्रिडा अधिकारी कविता नावंदे-निंबाळकर व क्रिडा अधिकारी नानकसिंह बस्सी या दोघांना लाच लुचपत प्रतिबंधक खात्याच्या एका पथकाने गुरुवारी (दि.२७) मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.

क्रिडा अकॅडमीच्या जागेवरील स्विमिंग पुलाच्या बांधकामासह या स्विमिंग पुलावर २०२४ साली आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धांच्या एकूण ९५ लाख रुपयांचे थकीत बिल मिळावे यासाठी तक्रारकर्त्याने जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा सुरु केला, परंतु प्रत्येकवेळी जिल्हा क्रिडा अधिकारी कविता नावंदे यांनी जाणिवपूर्वक त्रुटी काढल्या. त्यामुळे संबंधित कंत्राटदाराने या थकीत बिलांच्या मंजूरीकरीता क्रिडा अधिकारी बस्सी व जिल्हा क्रिडा अधिकारी नावंदे या दोघांच्या ३ मार्च रोजी स्वतः भेटी घेतल्या. त्यावेळी नावंदे यांनी २ लाख रुपये व बस्सी यांनी ५० हजार रुपये असे एकूण २ लाख ५० हजार रुपयांची लाच मागितली. संबंधित तक्रारकर्त्याने १३ मार्च रोजी नावंदे यांना क्रिडा अधिकारी बस्सी यांच्या समक्ष १ लाख रुपये सुपूर्त केले परंतु, उर्वरित दीड लाख रुपये द्यावयाची इच्छा नसल्याने या तक्रारकर्त्याने २४ मार्च रोजी लाच लुचपत प्रतिबंधक खात्याकडे एक तक्रार दाखल केली. या खात्याच्या पथकाने २४ मार्च रोजीच लाच मागणीची पडताळणी केली. बस्सी व नावंदे यांची भेट झाली नाही. २५ मार्च रोजी पुन्हा पडताळणी केली. त्यावेळी नावंदे यांची भेट झाली. तक्रारकर्त्याने प्रलंबित लाचेसंदर्भात बोलले असता नावंदे यांनी पक्षा समक्ष तक्रारकर्त्यास बस्सी सर येतील ते करुन टाका, असे म्हणून उर्वरित लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शविली. या खात्याने त्या आधारे गुरुवार २७ मार्च रोजी सापळा रचला व नानकसिंह बस्सी यास ५० हजार रुपये व जिल्हा क्रिडा अधिकारी नावंदे यांना १ लाख रुपयांची लाच स्विकारतांना ताब्यात घेतले.

### संघटनात्मक बुथ बांधणीसाठी भाजपच्या बैठका विधानसभा प्रमुख रुद्रवार यांचा दौरा

**गंगाखेड,/प्रतिनिधी:** भाजपाच्या प्रदेश कार्यालयाच्या सूचनेनुसार पक्षाच्या बुथ बांधणीसाठी गावोगावी बैठकीचे आयोजन करण्यात येत असून जनतेतून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत .

गंगाखेड मतदारसंघातील तिन्ही तालुक्यातील गाव, वाडी, तांडा या प्रत्येक ठिकाणी भाजपाचे ध्येय -धोरणे तसेच शासन राबवितात असलेल्या विकासात्मक योजना समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचवण्यासाठी संघटनात्मक पातळीवर बुथ बांधणी सुरू असुन यासाठी ताडकळस कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा भाजप गंगाखेड विधानसभा प्रमुख बालाजी रुद्रवार, भाजपा माजी पुर्णा तालुका उपाध्यक्ष नंदेश घोन्सीकर यांच्यासह कार्यकर्त्यांनी जोरदार प्रयत्न चालविले असून सर्वत्र बैठका घेत बुथ प्रमुखांसह बुथ वरिल सर्व पदाधिकाऱ्यांच्या निवडी केल्या . भाजप पदाधिकारी, कार्यकर्ता व गावातील प्रतिष्ठित नागरिकांना विश्वासात घेत बुथ मध्ये समाजातील सर्व स्तरातील लोकांना समाविष्ट करण्यात आले .

नुकतेच पुर्णा तालुक्यातील फुलकळस, खडाळा आदी ठिकाण बुथ बांधणी संदर्भात बैठका घेण्यात आल्या. यास जनतेचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. फुलकळस येथील बैठकीस गावातील विठ्ठलराव कुबडे, शिवकुमार शिराळे, शिवदास शिराळे, हारी ट मिसाळ, रामराव कोळेकर, पांडुरंग मोरताटे, भीमाशंकर शिराळे, सचिन पुरी, निवृती गलांडे, नवनाथ घोडेकर, आकाश गलांडे, देवीदास जगडे, गजानन गलांडे, शैलेश गलांडे यांच्यासह भाजपाचे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### बदललेल्या वेळापत्रकामूळे प्रवाशांत गोंधळ

**परभणी,/प्रतिनिधी :** लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई ते हुजूर साहिब नांदेड या गाडीच्या वेळापत्रकात अंशतः बदल करण्यात आला असून ही गाडी हुजूर साहिब नांदेड स्थानकावर रात्री २१.०० वाजता पोहोचण्या ऐवजी २०.१५ वाजता पोहोचेल, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली.
मध्य रेल्वे ने उन्हाळी सुट्टी निमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई ते हजूर साहिब नांदेड विशेष गाडीच्या २४ फेऱ्या पूर्ण करण्याचे ठरविले . यापैकी काही गाड्यांच्या वेळापत्रकात अंशतः बदल करण्यात आला . यापैकी गाडी संख्या ०११०५ लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई ते हजूर साहिब नांदेड विशेष गाडी - हि गाडी दिनांक ९ एप्रिल ते २५ जून, २०२५ दरम्यान दर बुधवारी लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई येथून रात्री ००:५५ वाजता सुटेल आणि ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड कुर्डूवाडी, लातूर, लातूर रोड, परळी, गंगाखेड, परभणी, पूर्णा मार्गे हजूर साहिब नांदेड येथे रात्री २०.१५ वाजता पोहोचेल.
गाडी संख्या ०११०६ हजूर साहिब नांदेड ते लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई विशेष गाडी - हि गाडी ०९ एप्रिल ते २५ जून २०२५ दरम्यान दर बुधवारी हजूर साहिब नांदेड येथून रात्री २२:३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई येथे गुरुवारी दुपारी १४:४५ वाजता पोहोचेल.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# सायकलच्या वेगाप्रमाणे अभ्यासाचा वेग वाढावा- कावरखे

**परभणी,/प्रतिनिधी:-** नुकतेच अंतराळवीर सुनीता विल्यम्स या महिलेने अंतराळात झेप घेऊन पुन्हा पृथ्वीवर येत जगात विक्रम केला.तसे तुम्ही मुली सुद्धा एक दिवस देश सेवेसाठी कामी यावे.यासाठी सायकलच्या वेगाप्रमाणे अभ्यासाला गती द्यावी असे प्रतिपादन तहसीलदार सुनील कावरखे यांनी शुक्रवार दि.२८ रोजी केले. ते श्री महालिंगेश्वर महाविद्यालयातील एका कार्यक्रमात बोलत.

सोनपेठ येथील श्री महालिंगेश्वर विद्यालयात मानव विकास अभियानांतर्गत विद्यालयातील इयत्ता पाचवी ते बारावी मध्ये शिकणाऱ्या मुलींना शाळेपासून शून्य ते पाच कि.मी. अंतरावरून शाळेला येण्या-जाण्यासाठी मोफत सायकल दिली जाते. यावेळी तहसिलदार सुनील कावरखे, गटशिक्षणाधिकारी शौकत पठाण, पत्रकार बाबासाहेब गर्जे,किरण स्वामी , सोमनाथ नागुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.बी. भोसले हे . यावेळी बोलताना तहसीलदार कावरखे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, अभ्यासाचा वेग सायकलच्या चाकाच्या वेगाप्रमाणे वाढावा अशी अपेक्षा व्यक्त केली तर गटशिक्षणाधिकारी शौकत पठाण यांनी सायकलचा वापर करून नियमित शाळेत येण्याचे व कठीण परीश्रम घेवून उज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले. शेवटी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मानव विकास योजनेअंतर्गत पात्र ७८ विद्यार्थीनिंना सायकलचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनींना बसची प्रतिक्षा करत शाळेला येण्या जाण्यासाठी खूप त्रास व्हायचा आणि वेळ पण जायचा त्यामुळे त्यांना मानव विकास योजने अंतर्गत सायकली मिळाल्याने विद्यार्थिनी आणि पालकांमध्ये आनंद दिसून आला. यावेळी गावातील पालकांसह शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित



. कार्यक्रमाची सांगता सायकल वाटप विभाग प्रमुख सहशिक्षक कालिदास मस्के यांच्यावतीने देण्यात आलेल्या अल्पोपहारानंतर झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक नामदेव निळे यांनी केले तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक रमकांत होडगे यांनी केले.

## मुंबई ते नांदेड विशेष रेल्वेच्या वेळापत्रकात अंशतः बदल

**परभणी,/प्रतिनिधी :** लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई ते हुजूर साहिब नांदेड या गाडीच्या वेळापत्रकात अंशतः बदल करण्यात आला असून ही गाडी हुजूर साहिब नांदेड स्थानकावर रात्री २१.०० वाजता पोहोचण्या ऐवजी २०.१५ वाजता पोहोचेल, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली.

मध्य रेल्वे ने उन्हाळी सुट्टी निमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई ते हजूर साहिब नांदेड विशेष गाडीच्या २४ फेऱ्या पूर्ण करण्याचे ठरविले . यापैकी काही गाड्यांच्या वेळापत्रकात अंशतः बदल करण्यात आला . यापैकी गाडी संख्या ०११०५ लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई ते हजूर साहिब नांदेड विशेष गाडी - हि गाडी दिनांक ९ एप्रिल ते २५ जून, २०२५ दरम्यान दर बुधवारी लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई येथून रात्री ००:५५ वाजता सुटेल आणि ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड कुर्डूवाडी, लातूर, लातूर रोड, परळी, गंगाखेड, परभणी, पूर्णा मार्गे हजूर साहिब नांदेड येथे रात्री २०.१५ वाजता पोहोचेल.

गाडी संख्या ०११०६ हजूर साहिब नांदेड ते लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई विशेष गाडी - हि गाडी ०९ एप्रिल ते २५ जून २०२५ दरम्यान दर बुधवारी हजूर साहिब नांदेड येथून रात्री २२:३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच लोकमान्य टिळक टर्मिनल मुंबई येथे गुरुवारी दुपारी १४:४५ वाजता पोहोचेल. या गाडीत जनरल, स्लीपर आणि वातानुकुलीत मिळून २२ डब्बे असतील, अशी माहिती रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागाने दिली.




## त्रिलोक कॉटनची पसवणूक करणाऱ्यांना चार महिन्यानंतर राज्यस्थानमधून अटक

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी-** त्रिलोक कॉटनची फसवणूक करणाऱ्यांना ४ महिन्यानंतर राजस्थानमधून अटक जिंतूर न्यायालयाने सुनावणी २ दिवसांची पोलीस कोठडी जिंतूर : येथील त्रिलोक कॉटन प्रायव्हेट लिमिटेड मध्ये सरकी ढेप पशुखाद्य निर्माण . सदरील पशुखाद्य हे भारतातील विविध राज्यात दलाला मार्फत विक्री करण्यात . याचाच फायदा घेत आरोपी नीरज धूत यांच्यामार्फत योगिता ट्रेडिंग कंपनी, नोखा राजस्थान यांना प्रथम तीस टन विक्री केली असता या व्यवहाराचे सनद येरळीवर मिळाल्याने पुन्हा याच दलालामार्फत याच कंपनीला दुमार ३० टन विक्री केली असता ज्या व्यवहाराची सनद देण्यास संबंधित दलाने टाळाटाळ केली. दलाल नीरज धुत व योगिता ट्रेडिंग कंपनीचे संचालक जेठाराम नायक यांच्या विरोधात जिंतूर पोलीस स्टेशन अंतर्गत कलम ३४, ४०६, ४१७, ४२०, नुसार फसवणुकीचा गुन्हा दि. ४ नोव्हेंबर २०२४ दाखल झाला असता पोलिसांनी या गुन्ह्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक पुंड यांच्या मार्गदर्शनात पथक नेमण्यात आले. सदरील पथकाने राजस्थान येथे जाऊन दोन आरोपींना अटक करून जिंतूर न्यायालयात हजर केले. या गुन्हा मध्ये जिंतूर न्यायालयाने या आरोपींना दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली . दरम्यान या पथकामध्ये सहायक पोलीस निरीक्षक पुंड, बीट जमादार दत्तराव गुंगाने पोलीस कॉन्स्टेबल जाधव हे . सदरील बाबीचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पुंड व जमादार दत्तराव गुंगाने करीत .

## आर.पी हॉस्पिटल मध्ये सहा बालकावर मोफत हृदय शस्त्रक्रिया संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यात प्रथमच आर.पी. हॉस्पिटलमध्ये सहा बालकांवर यशस्वी हृदय शस्त्रक्रिया संपन्न झाली.
लहान मुलांवर शस्त्रक्रिया होणे एक उल्लेखनीय घटना . सदरील शस्त्रक्रिया हॉस्पिटलच्या वतीने संपूर्णपणे मोफत करण्यात आल्या, ज्यामुळे गरजू कुटुंबांना व रुग्णांना मोठा आधार मिळाला. मागील महिन्यात दि.२४ फेब्रु.रोजी परभणी मेडिकल कॉलेज आर.पी. हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट येथे आ.डॉ.राहुल ट यांच्या संकल्पनेतून मोफत बालकांची हृदयविकार तपासणी, २ डी इको तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले . या शिबिरात बहुसंख्य बालकांना हृदयाचे आजार असल्याचे आढळले. त्यापैकी सहा बालकांवर आज हृदयाची अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ही शस्त्रक्रिया जगप्रसिद्ध बाल हृदयरोग तज्ञ डॉ.भूषण चव्हाण यांनी केली. डॉ.चव्हाण हे जगभरातील इराण,इराक,अफगाणिस्तान, मॉरिशियस सारख्या देशातील बालकावरती हृदयाची शस्त्रक्रिया करतात. त्याच्या हस्ते ह्या शस्त्रक्रिया झाल्या असल्याने सदरील बालकांना एका प्रकारे जीवनदान मिळाले . तसेच या उपक्रमामुळे परभणी जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रात एक नवीन पायंडा पडला असून, स्थानिक स्तरावर अशा गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध होणे हे समाजासाठी मोठे योगदान . आर.पी हॉस्पिटल चे अधिष्ठाता डॉ.प्रमोद शिंदे यांनी सांगितले की, हृदय शस्त्रक्रिया ही एक जटिल प्रक्रिया असते जी अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि कुशल डॉक्टरांच्या टीमच्या समन्वयाने यशस्वी होऊ शकते. परभणी सारख्या जिल्ह्यात अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया यशस्वी होणे हे येथील वैद्यकीय क्षेत्रातील वाढत्या क्षमतेचे द्योतक . या यशस्वी शस्त्रक्रियेमागे आर.पी हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमीर तडवी, बालरोगतज्ञ डॉ.बाबासाहेब गायकवाड, आरोग्य विभाग प्रमुख राहुल कांबळे,स्वप्नील बोर्डे , राहुल गायकवाड आणि संपूर्ण वैद्यकीय टीमचे हे अथक प्रयत्न आणि समर्पण .

## अहिल्या नगर येथील श्री तुळजाभवानी मंदिराच्या बांधकामाची बेकायदेशीर मोडतोड करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी-** अहिल्यानगर येथील श्री तुळजाभवानी मंदिराच्या परिसरातील मालकीच्या बांधकामाची बेकायदेशीर तोडफोड करणाऱ्या अधिकारी व व कर्मचाऱ्यावर कारवाई करणे बाबत व भगत कुटुंबाच्या होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात विरोधात जिल्हाधिकारी परभणी यांना जगदंबा शक्तीपीठ परिषद ट राज्याच्या वतीने लेखी निवेदन,,, तुळजाभवानी भक्त भगत परिवारांना संरक्षण द्या गुरुवर्य श्री प्रदीप चैतन्य फाले महाराज अखंड महाराष्ट्राची कुलस्वामीनी आणि त्र शिवाजी महाराज यांचे आराध्य दैवत असलेल्या तुळजाभवानीचे माहेर म्हणून परिचित असलेल्या श्री तुळजाभवानी देवी, बुऱ्हाणनगर, ता.जि. आहिल्यानगर मंदिर बळकविण्यासाठी स्थानिक पुढारी आ. शिवाजी भानुदास कर्डीले व त्यांच्या गुंडापासून होणाऱ्या होणाऱ्या त्रासाबाबत. जय भवानी जय शिवाजी जय संताजी, आई जगदंबा तुळजाभवानीने लहान मुलीच्या रूपात १२ वर्ष बुऱ्हाणनगर याठिकाणी आमचे पूर्वज संत जानकोजी भगत (तेली) यांच्या घरी वास्तव्य केलेले . संत जनकोजी तेली यांना तुळजाभवानीने साक्षात्कार देऊन वरदान दिले तेव्हापासून सुमारे ११०० वर्षापासून तेली समाजाच्या भगत घराण्याकडे असलेली तुळजाभवानी पालखी परंपरा अखंडपणे चालू .

भगत घराण्यातून श्री क्षेत्र तुळजापूर, धाराशिव येथे शारदीय नवरात्रीमध्ये प्रत्येक वर्षी गेल्या ११०० वर्षापासून अधिक काळापासून पालखी जाते आणि श्री तुळजाभवानीची देवीची मूळ मूर्ती पालखी मधून बसवून सीमोलंघन केले जाते आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विजयादशमी/ दसरा सण मोठ्या उत्सवात साजरा केला .

सदर परंपरेतून आणि भक्तीमधून कै.लहानू भिकू भगत (तेली )यांनी स्वतःच्या जमीनी विकून १९१३ साली घरातील देवघराला मंदिराचे स्वरूप दिले.सदर मंदिर देव्हारा महाराष्ट्रात प्रसिद्ध असून सर्व तुळजाभवानी भक्त आणि संपूर्ण तेली समाजाची आस्था याठिकाणी असून महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवनीचे माहेर अशी ओळख म्हणून नावारूपास आलेले हे मंदिर देव्हारा ऐतिहासिक महत्व असलेले .

यामुळे आकसापोटी व जातीय द्वेषातून गावातील गुन्हेगार पार्श्वभूमी असलेला आमदार शिवाजी कर्डीले हा तुळजाभवानीचे मंदिर आणि स्थावरमिळकतबळकविण्याच्या गैरहेतून प्रेरित होऊन गेल्या अनेक वर्षापासून पुजारी



भगत कुटुंबीयास वेगवेगळ्या मार्गाने सत्तेचा, प्रशासनाचा, पदाचा व गुंडीरीचा वापर करुन पुजारी भगत कुटुंबीयावर खोट्या केसेस करणे, घरावर चालून जाणे, शिवीगाळ करणे, हातपाय तोडणे, मारून टाकण्याची दमदाटी करणे, मंदिराविरुद्ध सत्तेचा गैरवापर करुन चुकीचे आणि लबाडीचे आदेश पारीत करून घेणे, बदनामी करणे, मंदीर व परिसराच्या विकासाच्या विरोधात कारस्थाने करणे, इतर मिळकतींमध्ये त्रास देणे इ. अनेक प्रकारे तिराईत इसमांना उभे करून मंदिरास व विविध विकासास त्रास देत आहे याबाबत अनेक तक्रारी पोलीस, महसूल, विधी व न्याय आणि इतर संबंधित शासकीय विभागास वेळोवेळी देवून देखील कुठलीही कारवाई होत नाही. याउलट आमदार शिवाजी कर्डीले वर अनेक खून, खंडणी, दंगल घडविणे ,पोलीस अधीक्षक कार्यालय तोडफोड असे अनेक गंभीर गुन्हे दाखल असतानाही व तसेच भष्ट्राचार, जमिनी बळकावणे, रस्ते अडवून अतिक्रमण करणे बेकायदेशीर बांधकामे इ. अनेक आरोप असतानाही कुठलीही कारवाई केली जात नाही. त्याच्या राजकीय पदाचा व सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून व संबंधाचा गैर वापर करून आम्हा पुजारी भगत कुटुंबास खूप त्रास देत .

नुकतेच दि. २०/०२/२०२५ रोजी स्थानिक प्रशासनास हाताशी धरून अधिकृत कायदेशीर बांधकाम असतानाही अनधिकृत बांधकाम असल्याचा बागलबुवा करून मंदीराच्या धार्मिक व सामाजिक कार्यक्रमासाठी स्वत:च्या मालकीच्या जागेत उभारण्यात आलेले सांस्कृतिक भवन उध्वस्त केले इतकयावरच न थांबता श्री देवी मंदिराचे प्रवेशद्वारही पाडले. देवीची पालखी व पूजा सामग्री इ.यांची तोडफोड करून विटंबना केली त्यामुळे आमच्या धार्मिक भावना दु:खावल्या गेल्या असून त्यामुळे आम्ही श्री देवीचे पुजारी भगत कुटुंबीय अत्यंत भयभीत होवून त्रासलेले आहोत. याबाबत योग्य त्या तक्रारी देखील दिलेल्या . परंतु राजकीय वरदहस्तामुळे कुठलीही कडक कारवाई केली जात नाही. तरी सर्व आपणास नम्र विनंती की,
१. श्री तुळजाभवानी देवी,बुऱ्हाणनगर,ता. जि.आहिल्यानगर मंदिर व आम्हास आ. शिवाजी भानुदास कर्डीले व त्यांच्या गुंडापासून होणाऱ्या त्रासापासून संरक्षण द्यावे.
२. मंदिर व शेकडो वर्षाची परंपरा टिकविण्यासाठी वरील सर्व बाबींचा विचार करून संबंधितांवर योग्य कडक कारवाई करून भगत परिवाराला न्याय देण्यात यावा अन्यथा जगदंबा शक्तीपीठ परिषद ट राज्याच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय परभणी या ठिकाणी दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येईल असे निवेदन जिल्हाधिकारी साहेब परभणी यांना देण्यात आले .

या निवेदनावर खालील पदे अधिकाऱ्यांच्या साक्षर निवेदन देण्यात आले श्री श्री १००८ महामंडलेश्वर गुरुवर्य श्रीप्रदीप चैतन्य फाले महाराज संस्थापक अध्यक्ष, गुरुवर्य श्री रंगनाथ गुरव राष्ट्रीय सचिव, गुरुवर्य श्री बबन गायकवाड देवकर, गुरुवर्य श्री शुभम भांबळे, गुरुवर्य प्रीती ताई माऊली लातूरकर विभागीय अध्यक्ष डॉ श्री गोविंद कामटे श्री रवि स्वामी श्री प्रभाकर शेंद्रे श्री ओमकार स्वामी मिटकर श्री पत्रकार शिंदे अधिक पदाधिकारी उपस्थित होते

# महिला तक्रार निवारण समिती कागदावरच

**दत्तात्र्ये कांबळे**
**लोहा, दि. २८ मार्च**

प्रत्येक विभागात महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करा असे शासनाचे आदेश असताना शासकीय व निमशासकीय विभागितील महिला तक्रार निवारण समित्या वाऱ्यावर आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारीची सखोल चौकशी व त्यांचे निराकरण करण्यासाठी आस्थापनामध्ये महिला तक्रार निवारण समिती गठीत न केल्यास ५० हजाराचा दंड लागू शकतो पण कार्यालयातील आस्थापना विभाग प्रमुखांचा निष्काळजी पणा दिसुन येत आहे.

शासकीय व निमशासकीय आस्थापना कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध मनाई व निवारण अधिनियम २०१३ च्या कलम ४(१) नुसार कार्यालय अंतर्गत येणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारीची सखोल चौकशी व त्यांचे निराकरण करण्यासाठी ज्या आस्थापनामध्ये दहा किंवा दहा पेक्षा जास्त अधिकारी कर्मचारी कार्यरत आहेत अशा प्रत्येक ठिकाणी तक्रार निवारण समिती स्थापन करणे आवश्यक असल्याचे शासन पत्रकात आदेशीत केले आहे .

शासकीय ,निमशासकीय कार्यालय ,संघटना महामंडळ, आस्थापना, संस्था शासकीय कंपनी किंवा खाजगी उपक्रम इंटरप्रायजसचे अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक ,पुरवठा व विक्री यासह वाणिज्य व्यवसायिक, शैक्षणिक, करमणूक ,औद्योगिक, आरोग्य आदी सेवा किंवा वित्तय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार ,रुग्णालय सुश्रुषाग्रहे , क्रीडा संकुले एमआयडीसी ,धर्मदाय आयुक्त, आरोग्य विभाग, कामगार कल्याण, शिक्षण विभाग ,शासकीय निमशासकीय व खाजगी शिक्षण संस्था, नगरपालिका, सहकार विभाग ,बँकिंग विभाग ,सहकारी पतसंस्था पतपेढी, शासकीय रुग्णालय, खाजगी रुग्णालय शॉपिंग मॉल,व्यापारी महामंडळ, मार्केट कमिटी, कोचिंग क्लासेस या ठिकाणी तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक आहे.

कायद्यातील व नियमातील विविध तरतुदी व जबाबदारीचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपयाचा दंड आकारणे तसेच हाच प्रकार पुन्हा केल्यास अस्थापनेचा परवाना रद्द करुन दुप्पट दंड वसुल करण्याचे आदेशात नमुद आहे.तशी तरतूद आहे पण कोणत्याही विभागात महिला तक्रार निवारण समितीचा दर्शनी फलक नाही. तसे भिंतीवर सुध्दा समिती स्थापन केले त्यामधील सदस्य संख्या कोणकोण आहेत याची अनेक महिला कर्मचाऱ्याना माहित नाही. तसे फलक सुध्दा कुठेच दिसत नाहीत . प्रत्येक विभागात फलक लावावे की लावून नये असे या संदर्भात माहिती विचारली असता कोणीच उत्तर दिले नाही. विभागातील कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती आहे की नाही या बाबत महिला कर्मचारी अनभिज्ञ आहेत या संदर्भात अनेक महिला कर्मचाऱ्यांना विचारणा केली पण काही महिलानी काहिच उत्तर दिले नाही.

पुरुष कर्मचाऱ्याला कार्यालयातील विभाग प्रमुखांनी त्रास दिला तर थेट वरिष्ठांच्या दालनात तक्रार करता येते पण अशा घटनेला थोडा कालावधी पुरुष कर्मचारी तक्रार देऊन निर्वपुरुषांसाठी सुध्दा पुरुष कर्मचारी तक्रार निवारण समिती आवश्यक आहे. असल्याचे काही पुरुष कर्मचारी मंडळींनी बोलून दाखवले. महिला तक्रार निवारण समिती आहे त्याच प्रमाणे पुरुष कर्मचारी तक्रार निवारण समिती स्थापन केली पाहिजे असेही काही पुरुष कर्मचारी मंडळींनी बोलून दाखवले.

# सर्वांनाच सीमेवर जाऊनच देशसेवा करण्याची आवश्यकता नाही : मुंडकर

**तभा वृतसेवा**
**बिलोली , दि. २८ मार्च**

सर्वांनाच सीमेवर जाऊन हातात बंदूक घेऊन देश सेवा करण्याची आवश्यकता नाही. प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम केल्यास ही सुद्धा देश सेवाच होय.असे प्रतिपादन प्रश्न सीमावर्ती भागाचे प्रमुख समन्वयक तथा ज्येष्ठ पत्रकार गोविंद मुंडकर यांनी केले. ते बिलोली येथील पंचायत समिती सभागृहात आयोजित निराधार, वृद्ध आणि दिव्यांगांच्या मेळाव्यात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी पोलीस उप निरीक्षक सोमनाथ स्वामी, आगारप्रमुख नरसिंग निमनवाड, सामाजिक कार्यकर्ते माधव आटगोरे यांचे प्रमुख उपस्थिती होती.

मुंडकर पुढे म्हणाले की, येथे उपस्थित असलेले आगार प्रमुख यांनी जन्मतः दिव्यांगांच्या, निराधारांच्या बाबतीत सर्व चालक आणि वाहकांची बैठक घेऊन त्यांना आजच्या कार्यक्रमाविषयी आणि अपंग निराधार यांच्या विषयीच्या संवेदना ज्या (आगार प्रमुखाच्या मनात निर्माण झाल्या)त्यांच्या मनात निर्माण झाल्या त्या चालक आणि वाहकांच्या मनातही निर्माण कराव्यात ज्यायोगे खऱ्या अर्थाने निराधार, दिव्यांगांना परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करताना, प्रवासात लाभदायक ठरेल. मुंडकर यांचे भाषण सुरू असताना आगारप्रमुखांनी उभे राहून याबाबत जाहीर अभिवचन दिले. याप्रसंगी अवयव दान समितीचे श्री माधव आटकोरे यांनी आपल्या कार्याविषयीची माहिती उपस्थित निराधार आणि वृद्ध बांधवांना दिली. यावेळी आगार प्रमुख यासह अनेकांनी आपापल्या क्षेत्रात काम करणाऱ्या सहकाऱ्यांना निराधार आणि वृद्धांच्या संवेदना प्रकट करून ही चळवळ लोकाभिमुख केली जाईल अशा भावना व्यक्त केले. समारोप चंपत डाकोरे यांनी केले.यावेळी निराधार आणि वृद्ध बंधू भगिनींनी सभागृह खचाखच भरला होता. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन गौतम भालेराव यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### आर्य वैश्य महिलामंडळाच्या वतीने कडूलिंब सालामृत व रस सेवनाचे आयोजन

**हदगाव**-हदगाव येथील आर्य वैश्य महिलामंडळाच्या वतीने व्याधीमुक्त



निरामय आरोग्यासाठी जागतिक महिला दिनानिमित्त किशोर बनगिनवार दिग्रस यांचा कडुलिंब सालामृत व रस प्राशनाचा पाच दिवसीय शिबीराचे आयोजन एक एप्रिल ते पाच एप्रिल ला केले आहे. कडुलिंबाच्या झाडाला आयुर्वेदात अत्यंत महत्त्व पाडव्यास नवीन मोहर आलेल्या कडुलिंबाचे औषधीयुक्त गुण अधिक परिणामकारक होत असल्याने संपूर्ण चैत्र महिन्यात अनेक नागरिक कडुलिंबाच्या अंतर सालीच्या रसाचे किंवा पाल्याचे पाण्याचा रसाचे सेवन करतात शरीरातील अनेक व्याधीवर गुणकारी असलेल्या कडुलिंबाच्या आंतरसालीच्या रसाचे सेवन दिग्रस येथील कृषी व्यवसायिक ७७ वर्षीय किशोर बनगिनवार हे मागील ४० वर्षापासून करीत असून त्यांना त्यापासून फायदा म्हणजे ते निरोगी जीवन जगत आहे. त्यांच्या या अनुभवाचा फायदा जास्तीत जास्त नागरिकांना व्हावा या उद्दात हेतुने ते मागील बारा वर्षांपासून या शिबिराचे आयोजन करीत आहेत १एप्रिल ते ५ एप्रिल पर्यंत सतत पाच दिवस हनुमान मंदिर कोर्टाजवळ वेळ सकाळी ६.३० ते ७.३० वाजता कडुलिंबाच्या आंतरजालीच्या साला मृताचे प्राशन शिबीर आयोजित केले आहे . या शिबिराचा लाभ शहरातील सर्व नागरिकांनी घेण्याचे आव्हान आर्य वैश्य महिला मंडळाने केले आहे. कडूलिंब सहलामृत मातृप्रस्थल्याची थोडक्यात माहिती कडुलिंबाची झाडाची अंतर साल काढण्याकरिता ब्रह्म मुहूर्तावर कडूलिंबाच्या झाडाजवळ प्रार्थना करून झाडाला क्षती पोहचनार नाही याची दक्षता घेऊन आंतरसाल काढावी व साल काढलेल्या जागेवर माती व शेनाच्या लिहावे. काढलेल्या सालीच्या वरील कणखर भाग काढून आंतरजालीचे बारीक तुकडे करून खलबत्यात बारीक करावे नंतर त्यात थोडे पाणी घालून तयार झालेल्या लगद्यावर त्या नंतर आवश्यकतेनुसार पाणी टाकून ते मिश्रण खलबत्याने रगडावे आणि पातळ कपड्याने गाळून तयार झालेल्या रसात गारगोटी गरम करून त्याचा चटका त्या रसात द्यावा हा रस दररोज सकाळी उपाशीपोटी एक तास काहीही न खाता हा रस सतत पाच दिवस घेतल्यास रक्त शुद्धी सोबतच त्वचारोग, शुगर चक्कर येणे , शरीरातील अनेक व्याधीवर आराम मिळतो तरी जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन आर्य वैश्य समाज महीला मंडळा कडुन करण्यात आले.

### प्रश्नमंजुषा स्पर्धेस प्रतिसाद




**कुंडलवाडी**-अध्ययन संस्था मुंबई व संस्कृती सवंर्धन मंडळ सगरोळी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ मार्च रोजी अध्ययन संपर्क विज्ञान मंडळा ची प्रश्नमंजुषा स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत कुंडलवाडी पासून जवळच असलेल्या हुनगुंदा येथील सोन्याबाई ठक्करवाड माध्यमिक विद्यालय प्रथम क्रमांक पटकावला आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही अध्ययन संस्था मुंबई व संस्कृती सवंर्धन मंडळ सगरोळी यांच्या संयुक्त विद्यमाने ओलंपियाड विज्ञान मंडळा ची प्रश्नमंजुषा स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. यात तालुक्यातील एकुण सात शाळा सहभागी झाल्या होत्या.सर्वच शाळांतील विद्यार्थ्यांनी अध्ययन संपर्क मासिकाचा अभ्यास करून छान प्रतिसाद दिला. त्यात हुनगुंदा येथील सोन्याबाई ठक्करवाड माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थीनी कु.अंजली विनोद भाले व म्याकलवार प्रशांत मदारी या विद्यार्थ्यांनी एकशे दहा पैकी एकशे पाच गुण घेऊन तालुक्यातुन प्रथम क्रमांक पटकावला असल्याने पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सोन्याबाई ठक्करवाड माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थीनी कु. अंजली विनोद भाले व म्याकलवार प्रशांत मदारी हे प्रथम आल्याने संस्थेचे अध्यक्ष ॲड. विलासराव कुलकर्णी सर, संस्थेचे सचिव तथा माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड, सहसचिव अरविंद लक्ष्मणराव ठक्करवाड यांच्यासह सर्व संचालक मंडळ व विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.बी.जिंकले,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक व अभिनंदन केले.

# स्वस्वरूप संप्रदायच्या वतीने शोभायात्रेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २८ मार्च**

हिंदू नववर्षाचा प्रथम दिवस म्हणजे गुढीपाडवा या निमित्ताने अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज दक्षिणपीठ नाणीजधाम रत्नागिरी यांच्या दिव्य प्रेरणेने स्वस्वरुप संप्रदाय दक्षिण नांदेड जिल्ह्याच्या वतीने देगलूर येथे दि.३० मार्च रोजी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आली आहे.



राज्यभर हिंदू नववर्ष, चैत्र प्रतिपदा व वसंत ऋतुचा दिवस म्हणजे गुढीपडवा, यशाचा व कीर्तीचा तथा प्रभू रामचंद्र रावणाला पराभूत करुन अयोध्योत आगमन केले. हा विजयाचा दिवस मानला जातो.

भारतीय संस्कृतीचे जतन व वारसा पुढील सांप्रदायासाठी आदर्श राहावा सालाबाद म्हणून संप्रदाय बंधू-भगनी पारंपरिक वेशभूषेत ३० मार्च रोजी स्वरूप संप्रदाय दक्षिण नांदेड जिल्हा समितीच्या वतीने सकाळी ८ वा. देगलूर येथील बंड्याप्पा मठ येथून प्रारंभ होणार असून प्रमुख मार्गाने जात तूकाराम नगर येथे समाप्त होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या यात्रेत जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानाचे जनकल्याणकारी, सामाजिक उपक्रमाची जनजागृती केली जाणार आहे. या नववर्षाच्या शोभायात्रेत देगलूर, मूखेड,बिलोली तालुक्यातील भाविकांनी शोभायात्रेत सहभाग घेत या शुभ दिनाचा, यशाचा, कीर्तीचा व विजयाचा आनंद घ्यावा असे आवाहन नांदेड दक्षिण जिल्हा निरीक्षक बालाजी कोठारे, जिल्हा अध्यक्ष शामभाऊ नागलगावे, मूखेड तालुका अध्यक्ष मारोती ईबितवार यांनी केले आहे.

# साईरुद्राक्ष मठदेवरूची नवोदयसाठी निवड

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २८ मार्च**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तडखेल येथील विद्यार्थी साईरुद्राक्ष चन्नबस मठदेवरू याची केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालय शंकरनगर येथे प्रवेशाकरिता निवड झाली आहे.



नांदेड जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालयच्या इयत्ता सहावी वर्गासाठी जानेवारी मध्ये प्रवेश परीक्षा घेण्यात आली होती. त्याचा निकाल नुकताच लागला असून यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तडखेल येथील विद्यार्थी साईरुद्राक्ष चन्नबस मठदेवरु याची निवड झाली आहे. त्याच्या या यशाबद्दल शंकरप्पा मठदेवरू, गंगाधर स्वामी, महालिंग स्वामी, शिवानंद स्वामी,प्रा.सी.एस.मठदेवरू, बस्वराज स्वामी, डॉ. राचप्पा हसगुलकर,शिवप्रसाद स्वामी, डॉ. प्रशांत स्वामी,अमोल मठदेवरू, प्रफुल्ल मठदेवरू, बसवलिंग स्वामी, डॉ. शिवकार्तिक स्वामी, डॉ. एस. शिवपूजिता आदींनी अभिनंदन केले आहे.

# रायुकाँच्या प्रदेश सरचिटणीसपदी राहुल हंबर्डे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २८ मार्च**

नांदेड दक्षिण मतदार संघातील धडाडीचे युवा कार्यकर्ते राहुल मोहनराव हंबर्डे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत आहे.



माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांचे सुपुत्र राहुल हंबर्डे यांचा शहर व ग्रामीण परिसरात दांडगा जनसंपर्क आहे. पक्षाध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, युवक राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनवाढीसाठी सुरुवातीपासूनच जोमाने काम सुरू केले आहे. सदस्य नोंदणी अभियानात जिल्ह्याचा अहवाल क्रमांक यावा यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. या भागातील जिल्हा परिषद सर्कलमध्ये त्यांच्या कार्यकर्त्यांची मोठी फौज आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या शिफारशीवरून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी त्यांची ही नियुक्ती केली आहे. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते त्यांना नुकतेच नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले, यावेळी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, अविनाश राव घाटे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, बाळासाहेब रावणगावकर, जीवन घोगरे, वसंत सुगावे, मोहसीन खान पठाण, श्रीधर नागपूरकर, बालाजी शिंदे, माधव चिंचाळे, प्रसाद पवार, शिवा डांगे, गणेश येरकले प्रदीप देमगुंडे आदीची उपस्थिती होती.या नियुक्तीबद्दल राहुल हंबर्डे यांनी पक्षश्रेष्ठींचे आभार मानले. त्यांच्या या नियुक्तीबद्दल नांदेड दक्षिण मतदार संघातील माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# वन्य प्राण्यांसाठी वन विभागाकडून पानवठ्याची सोय!



**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि. २८ मार्च**

देगलूर वन परिक्षेत्रात येणाऱ्या मौजे मानूर, भूतन हिप्परगा, बेंबरा, परिसरात आढळणारी वन्य प्राणी मोर, हरिण, नीलगाय, कोल्हा, सायाळ, रानडुक्कर, काळवीट यांच्यासह अनेक प्रजातींच्या पक्षांचे वास्तव्य असून परिसरात पाण्याअभावी गेल्या अनेक महीण्यापासून पाण्यासाठी भटकंती करत असल्याने पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून नांदेड जिल्ह्याचे उपवनसंरक्षक केशव वाबळे, भीमसिंह ठाकूर, देगलूर वनपरिक्षेत्र अधिकारी निखिल हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात गुरुवार दि. २७ रोजी कृत्रिम पानवटा निर्माण करून टँकरद्वारे पाण्याची सोय करण्यात आली आहे. सदरील पानवटा निर्माण करण्याकरिता वनपाल शंकर गेडाम, वनरक्षक कदम, वनमजूर राठोड यांचे प्रयत्न लागले आहे.

# गुढीपाडवा, रमजान ईद, रामनवमी सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पायाभूत सुविधा द्या

## युवानेते व्यंकट नेम्मानिवार यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २८ मार्च**

गुढीपाडवा सण,मुस्लिम बांधवांचा रमजान व त्यानंतर येणाऱ्या रामनवमी सणाच्या पार्श्वभूमीवर किनवट नगरपालिकेने शहरातील पथदिवे,नालेसफाई तसेच रस्ता सुधारण्याची कामे त्वरित हाती घ्यावीत अशी मागणी भाजपाचे युवानेते,किनवट नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष व्यंकट नेमानीवार यांनी केली आहे.



गुढीपाडवा या दिवसापासून हिंदू धर्मियांच्या नवीन वर्षाला प्रारंभ होतो. ३० मार्च रोजी गढीपाडवा असून किनवट शहरात ठीक ठिकाणी हा सण विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्साहात साजरा केला जाणार आहे तर ३१ मार्च रोजी मुस्लिम बांधवांचा रमजान ईद हा सर्वात मोठा सण आहे.त्यानंतर ६ एप्रिल रोजी रोजी रामनवमी हा सण साजरा केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर नगरपालिका प्रशासनाने पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्याची आवश्यकता आहे. शहरातील मुख्य मार्गावरील तसेच अनेक प्रभागातील बहुतांश पथदिवे बंद असून ते पूर्ववत सुरू करावेत. रामनवमीच्या रथयात्रेत नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी मिरवणूक निघणाऱ्या प्रमुख मार्गांची दुरुस्ती करावी तसेच नालेसफाई व स्वच्छतेची कामे हाती घ्यावीत अशी मागणी भाजपाचे युवानेते, माजी उपनगराध्यक्ष व्यंकट नेम्मानीवार यांनी केली आहे.



**नांदेड-आर्य वैश्य मंगल कार्यालय मुखेड येथे गुढीपाडवा व रमजान ईद व रामनवमी व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती सण उत्सवानिमित्त आमदार डॉ .तुषार राठोड साहेब यांच्या अध्यक्षखाली शांतता समितीची बैठक पार पडली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, तहसीलदार राजेश जाधव, पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे , लक्ष्मणराव पाटील, खुशालराव पाटील, अशोकराव गजलवाड, बालाजी पाटील आदी उपस्थित होते.**

# तामसा भागात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्याची गरज

**महेश मठपती**
**तामसा, दि. २८ मार्च**

तामसा भागातील तलाव गाळात रुतल्यामुळे सिंचनक्षेत्र कमालीचे घटले आहे. जिल्हा प्रशासनाने तामसा भागात राज्य शासनाकडून राबविण्याल्या जाणारी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही महत्वकांक्षी योजना राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.



तामसा भागात साधारणतः नऊ सिंचन तलाव आहेत. तलावाच्या निर्मितीपासून त्या तलावातील गाळ काढण्यात आला नसल्याने सर्वच तलाव गाळात रुतले आहेत. गाळामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता घटली आहे. अर्थातच भिजवण क्षेत्र देखील कमालीचे घटले आहे. केदारगुडा तलावावर २ हजार हेक्टर जमीन भिजवण्याची क्षमता होती. तलाव गाळात रुतल्याने सध्या केवळ ७०० ते ८०० हेक्टर एवढेच क्षेत्र पाण्याखाली आहे. पिंपराळा तलावासह ईतर तलावाची देखील परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. चांगला पाऊस पडला आणि तलाव भरले तरच शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील गहू, हरभरा, उन्हाळी ज्वारी ही पिके घेता येतात. अन्यथा खरीप हंगामातील एकाच पिकावर समाधान मानावे लागते. परिणामी या भागातील शेतकरी सदानकदा आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतो. बारमाही सिंचन व्यवस्थेसाठी लोकप्रतिनिधींची उदासीनता शेतकऱ्याच्या मुळावर आहे. राज्य शासनाने नुकतीच गाळमुक्त धरण व गाळयुक्त शेती ही महत्वकांक्षी योजना राबविण्याचे ठरविले आहे. जिल्हा प्रशासनाकडून तलावातील गाळ काढून गाळमुक्त धरण करुन निघालेला गाळ शेतात टाकून गाळयुक्त शेती केली जात आहे. त्याशिवाय नद्या नाला सरळीकरणाची कामे मोठ्या प्रमाणात केली जात आहेत. जिल्हाभरात ही योजना शक्तीने राबवल्या जात आहे. परंतु हदगाव तालुक्यात या योजनेबद्दल प्रशासनाकडून किंवा लोकप्रतिनिधीकडून कुठची वाच्यता केली जात नसल्याने या योजनेपासून हदगाव तालुका वंचित राहणार का? अशी शेतकऱ्यांना धास्ती वाटत आहे. जिल्हा प्रशासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शेती ही योजना हदगाव तालुक्यात राबवून गळात रुचलेले सगळेच तलाव गाळमुक्त करावेत, नदीनाल्यांचे सरळीकरण करण्यासाठी जिल्हा प्रशासनानेच पुढारकार घ्यावा. अशी मागणी शेतकऱ्यातून पुढे आली आहे.

# आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थीनीस वेदांत संगणक प्रशिक्षण केंद्रात नि:शुल्क प्रवेश

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. २८ मार्च**

तालुक्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनीस शहरातील वेदांत संगणक प्रशिक्षण केंद्राचे संचालक संदीप धांडे पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत नि:शुल्क प्रवेश दिला आहे,या प्रवेशामुळे नांदला दिग्रस येथील दुर्गा क्षिरसागरचा संगणक प्रशिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.



पुण्यातील शंकरराव भोई प्रतिष्ठानच्या वतीने नांदेड जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी पुण्यजागर प्रकल्प राबवण्यात येत आहे.या प्रकल्पातील विद्यार्थीनी दहावीची परीक्षा देऊन गावी परत आल्या आहेत.या उन्हाळ्याच्या सुट्टीत एम एस सिआयटी हा संगणक प्रशिक्षण शिक्षणक्रम करण्याचा निर्णय घेतला होता.पण या शिक्षणक्रमसाठी लागणारे शुल्क क्षिरसागर कुटुंबाला परवडणारे नव्हते.ह्या शिक्षणक्रम करण्यासाठी त्यांनी भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ मिलिंद भोई व पुण्यजगार प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक लक्ष्मीकांत मुळे, सामाजिक कार्यकर्ते दत्ता पाटील नवले, गुणवंत विरकर यांच्याशी संपर्क केला. वेदांत संगणक प्रशिक्षण केंद्राचे संचालक संदीप धांडे पाटील यांचीही संपर्क करुन शेतकरी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बद्दल व पुण्यजागर प्रकल्पाची माहिति समन्वयक लक्ष्मीकांत मुळे यांनी दिली. तेव्हा संदीप धांडे पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत अल्प शुल्कात प्रवेश दिला. या सहकार्यामुळे दुर्गा ज्ञानेश्वर क्षिरसागर हीचे संगणक प्रशिक्षणाचे स्वप्न साकार होणार आहे.

आत्महत्या केली शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी जो पुण्यजागर प्रकल्प राबवण्यात येत आहे आहे. हा एक स्तुत्य उपक्रम असून या शैक्षणिक उपक्रमांत सहभागी होण्याची संधी मला मिळाली आहे. यापुढेही आशा कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यात येईल अशा भावना संदीप धांडे यांनी व्यक्त केल्या.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# भुजल पातळी खालावली, पाणी प्रश्न गंभीर होण्याआगोदर उपाय योजना करा

## उल्हास गिराम यांचे तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ मार्च**

या वर्षी पाऊसकाळ अल्प प्रमाणात झाल्यामुळे भुजल पातळी मार्च मार्च महिन्यातच खालावली असून ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याबरोबर पशुधन वाचवण्यासाठी वेळीच उपाय योजना करावी, या संदर्भात बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली.



ग्रामीण भागात पाणी प्रश्न डोके वर काढु लागला आहे. ज्या तलावात आज ही उपलब्ध पाणी साठा बरा आहे, अशी तलावे पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करावीत, आवश्यक तिथे नियमित पाणीपुरवठा करावा, आवश्यक तिथे पाणी टँकर पुरवावेत, फार्मर आयडी साठी मुदतवाड मिळावी या मागणीचे निवेदन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नूतन जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी बीड च्या तहसील कार्यालयास भेट दिली, तहसीलदार उपलब्ध नसल्याने नायब तहसीलदार सुहास हजारें साहेब यांना निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली.

यावेळी त्यांच्या समवेत शिवसेना जिल्हा समन्वयक संजय भाई महाद्वार, जिल्हा सहसंघटक रतन गुजर, उपजिल्हाप्रमुख राजु महुवाले, बीड विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोठुळे, बंटी परदेशी, दिलीप पवार, बाळू वैद्य, व आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मौजे नांदुर येथे हनुमान मंदिर कलशारोहन व मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

## तिन दिवसीय किर्तन महोत्सवाने रंगत

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ मार्च**

शहरापासुन जवळच असलेल्या मौजे नांदुर येथे हनुमान मंदिर कलशारोहन व हनुमान मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला तर दि. २५ ते २७ अशा तिन दिवसीय किर्तन महोत्सवाने या सोहळ्यात रंगत आणली.



दि. २५ मंगळवारी रात्री भागवताचार्य ह.भ.प. परमेश्वर महाराज कुरे यांचे हरिकिर्तन झाले तर दि. २६ बुधवारी ह.भ.प. १००८ शिवेंद्र महाराज यशवाडीकर यांच्या उपस्थितीत कलशारोहन व प्राणप्रतिष्ठा सोहळा व रात्री सांप्रदायिक हरिकिर्तन भाविक - भक्तांच्या उपस्थितीत पार पडले. दि. २७ गुरूवारी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. शांतीब्रम्ह महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या काल्याच्या किर्तनाने सोहळ्याची सांगता झाली. बोलतांना ह.भ.प. महादेव महाराज म्हणाले की, हनुमंतरायाच्या इच्छेने व बाळुमामा मायकर यांच्यामुळे नांदुर येथे हा किर्तन सोहळा व कलशारोहन, मुर्ती प्राणप्रतिष्ठा झाली यापुढेही असे कार्यक्रम व्हावेत अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली. यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. किर्तन महोत्सवासाठी ह.भ.प. सुभाष महाराज होगे, ह.भ.प. गोविंद महाराज शेंडगे, ह.भ.प. अनंत महाराज शेंडगे, मृदंगाचार्य बिभिषण महाराज मायकर, विठ्ठल महाराज अंबुरे, शत्रुघ्न महाराज पठाडे, अंगद महाराज डाके यांची उपस्थिती होती. यावेळी मौजे नांदुर गावातील भाविक - भक्तांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



विधानसभेच्या लोकलेखा समितीवर सदस्य म्हणुन माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ. प्रकाश (दादा) सोळंके यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करतांना बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे, उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे, नवनाथ धाईजे.

# बुद्धगया महाबोधी बुद्धविहारावर बौद्धांचा ताबा मिळेपर्यंत आंदोलनं चालूच राहणार!

## माजलगाव कृती समितीचे पत्रकार परिषदेतून आव्हान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ मार्च**

विश्ववंदनीय तथागत महाकारुणिक गौतम बुद्ध यांना ज्या ठिकाणी संबोधि प्राप्त झाले ज्या ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली ते ठिकाण म्हणजे बिहार राज्यातील बुद्धगया होय बुद्धगया येथे पिंपळाच्या वृक्षाखाली राजकुमार सिद्धार्थला ज्ञान प्राप्त होऊन ते सिद्धार्थ भगवान गौतम बुद्ध झाले त्या ठिकाणी जगातील महान सम्राट राजा अशोकाने बुद्ध धर्म स्वीकारल्या नंतर तेथे मोठे विहार बांधले ते विहार आज जगातील बौद्ध धर्मियांसाठी पवित्र व आस्थेचा स्थान असून ते ब्राह्मण पुजाऱ्यांच्या ताब्यात आहे ते मुक्त होऊन बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी बी.टी.एम. क्ट १९४९ हा कायदा रद्द करावा या मागणीसाठी संपूर्ण जगभर व संपूर्ण भारतभर आंदोलन चालू आहे हे विहार बुद्धांनी समतेची क्रांती केली व प्रतिक्रांतीनंतर ब्राह्मन महंतांनी त्यावर कब्जा मिळविला ते बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी सर्वप्रथम इ.स. १८१८ मध्ये भंते अनागरिक धर्मपाल यांनी आंदोलन केले व ते अनेक वर्ष चालू राहिले आणि त्याचा परिपाक म्हणून बिहार टेम्पल ऍक्ट १९४९ हा कायदा आणून त्यामध्ये चार बौद्ध भिक्षू चार ब्राह्मण पुजारी व त्या विहाराचा अध्यक्ष हा बुद्धगया जिल्ह्याचा कलेक्टर जो की हिंदू धर्मीय ब्राह्मणच असला पाहिजे आणि तो जर ब्राह्मण नसेल तर इतर चार ब्राह्मणांपैकी कोणीतरी अध्यक्ष असावा असा हा जाचक १९४९ चा बी टी एम क्ट आहे.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोंबर १९५६ साली बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर भारतातील बौद्ध धर्मात वाढ होऊन समाज जागृत झाला व भारत स्वतंत्र झाल्यानंतर संविधान लागू झाले आणि संविधानात स्पष्ट उल्लेख आहे की १९५० पूर्वीचे भारतातील जे जुने कायदे आहेत ते रद्द समजण्यात आले असून भारताच्या संविधानानुसार भारतातील सर्व कायदे व कानून लागू झालेली आहेत. त्याच तत्वावर बिहार राज्यातील बिटी ऍक्ट ४९ रद्द करावा यासाठी माजलगाव जिल्हा बीड येथील बुद्धगया महाबोधी महाविहार आंदोलन कृती समिती ची स्थापना होऊन समितीचे अध्यक्ष विजय साळवे यांनी ही माहिती सांगितली व बी.टी.एम.क्ट १९ ४९ हा बिहार राज्यात जाचक कायदा लागू असल्याने बुद्ध धर्मियांच्या संपूर्ण ताब्यात आलेली नाही म्हणून हे महाविहार संपूर्ण बौद्ध धर्मीयांच्या ताब्यात द्यावे यासाठी भारतात प्रत्येक राज्यात आंदोलन चालू आहे व माजलगाव येथे सुद्धा गेल्या ०५ मार्च २०२५ रोजी तहसील कार्यालयासमोर संपूर्ण हजारो बौद्ध धर्मीयांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले व दिनांक २८ मार्च २०२५ रोजी रास्ता रोको आंदोलन याच मागणीसाठी माजलगाव मध्ये करण्यात येणार होते परंतु जमावबंदी आदेश बीड जिल्ह्यात लागू असल्यामुळे तो रास्ता रोको रद्द करून पत्रकार परिषदेत हे सांगून रास्ता रोको पुढे करण्यात येणार आहे अशी माहिती बुद्धगया महाविहार आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष विजय साळवे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली तर बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी हे विहार मुक्त करण्यासाठी केवळ भारतातच नव्हे तर जगभरात अमेरिका, इंग्लंड थायलंड अशा अनेक देशात आंदोलने चालू आहेत परंतु त्याच्या बातम्या बाहेर देशातील न्यूज चैनल दाखवतात परंतु भारताचे दुर्दैव न्यूज चैनल या बातम्या दाखवत नाहीत तर भारतातीलच आंदोलनाच्या बातम्या सुद्धा ही चैनल वाले दाखवत नाही तर या कृती समितीचे ज्येष्ठ नेते दयानंद भाऊ स्वामी यांनी सांगितले की आपल्या प्रिंट मीडियाने आतापर्यंत आम्हाला अनेक आंदोलनामध्ये मग ते भूमिहीन आंदोलन असेल गायरान जमिनीचे आंदोलन असेल नामांतराचे आंदोलन असेल त्या प्रत्येक आंदोलनात आपल्या पत्रकार बांधवांनी आम्हाला सहकार्य केलेले आहे व बातम्यांना चांगली प्रसिद्धी दिली आहे पुढेही आपले सहकार्य करावे असे आवाहन केले या पत्रकार परिषदेचे प्रास्ताविक ज्येष्ठ नेते कचरू खळगे यांनी केले याप्रसंगी अंकुशराव जाधव सचिन उजगरे बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष एस बी मोरे धम्मानंद साळवे डॉ श्रीराम खळगे पांडुरंग जाधव ड. रवींद्र टाकणखार.दीपक टाकणखार यांच्यासह बुद्धगया महाबोधी महाविहार आंदोलन कृती समितीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते

# हिवरा गोवर्धन येथील प्रगतिशील शेतकऱ्याने केली सेंद्रिय पद्धतीने करडईची लागवड

**भेसळयुक्त तेलापासुन बचावासाठी युवक शेतकरी भागवतराव निर्मळ पाटील यांचा वेगळा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ मार्च**

जगभरामधे दिवसेंदिवस आधुनिकतेचे वारे वाहायला लागलेले असल्यामुळे,ग्रामीण भागात शेतकरीही रासायनिक खते व बी-बियाणे वापरून उत्पादन वाढीच्या दिशेने वाटचाल करताना पाहायला मिळतात परंतु,यामुळे भेसळयुक्त अन्नपदार्थ व तेलाचे सर्वत्र उत्पादन आणि विक्री होत असते.भेसळयुक्त तेलाच्या सेवनामुळे आपल्याला अनेक आजारांना सामोरे जावे लागते.या आजारांपासून बचाव करण्याच्या उद्देशानेच आणि भेसळविरहित तेल आपल्या दैनंदिन आहारामध्ये वापरावयास मिळण्यासाठी हिवरा गोवर्धन गावातील प्रगतीशिल युवक शेतकरी भागवतराव निर्मळ पाटील यांनी त्यांच्या दहा एक्कर शेतीमध्ये सेंद्रिय पद्धतीने करडई पिकाची लागवड/पेरणी केलेली आहे.सद्या त्यांच्या शेतातील करडईचे पीक काढणीला आलेले आहे.सुरुवातीला २०२४ साली भागवतराव निर्मळ पाटील यांनी त्यांच्या तीन एक्कर शेतीमध्ये सेंद्रिय पद्धतीने करडई पिकाचे उत्पादन घेण्याचा पहिला प्रयोग केला.त्यावेळेस केलेल्या पहिल्या सेंद्रिय पद्धतिच्या करडई पिकाचा फायदा त्यांना जाणवला त्यामुळे भागवतराव निर्मळ पाटील मागच्या दोन वर्षांपासून सेंद्रिय पद्धतीने करडई पिकाचे उत्पादन घेत आलेले आहेत.करडई पिकाचे सेंद्रिय पद्धतीने उत्पादन घेण्यासाठी भागवतराव गावरान बियाण्याचाच वापर करीत असतात.



पेरणी ते काढणी,कमी मेहनत अधिक नफा आणि फायदे.

करडई हे रब्बी हंगामातील पीक असून, करडईची पेरणी करण्यासाठी एक्करी पाच ते सात किलो बियाणे लागते.करडई हे पीक काटेरी प्रकारचे असल्यामुळे त्याचे रानटी प्राण्यांपासून संरक्षण करण्याची आवश्यकता भासत नाही. करडईचे पीक सेंद्रिय पद्धतीने घ्यायचे झाल्यास त्याला फवारणी व रासायनिक खते देण्याची देखील आवश्यकता भासत नाही,त्यामुळे शेतकऱ्यांचा आणावश्यक खते व फवारन्यांचा खर्च देखिल वाचतो. सेंद्रिय पद्धतीने लागवड/पेरणी केलेल्या करडई पिकाची पेरणी व काढणी एवढीच मेहनतीची कामे असतात.आजकाल अनेक शेतकरी हार्वेस्टरच्या माध्यमातून पिकांची काढणी करत असतात.एका एक्करमध्ये सेंद्रिय पद्धतीच्या करडई पिकातून साधारणत: चार ते पाच क्विंटल करडईचे उत्पादन मिळत असल्याचे भागवतराव निर्मळ पाटील यांनी सांगितले.सेंद्रिय पद्धतीच्या करडई उत्पादनाचा एक्करी खर्च दोन ते तीन हजारांपर्यंत व उत्पादन पंचवीस हजारांचे मिळत असल्याचे देखील भागवतराव यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

क्विंटलमागे बावीस ते तेवीस किलो तेल व पन्नास ते पंचावन्न किलो पेंढ

सेंद्रिय पद्धतीने उत्पादित केलेल्या एका क्विंटल करडई मागे बावीस ते तेवीस किलो शुद्ध करडईचे खाद्यतेल व पन्नास ते पंचावन्न किलो जनावरांना खाण्यासाठी पेंढ मिळत असल्याचा दावा प्रगतिशील शेतकरी भागवतराव निर्मळ पाटील यांनी केला. करडईचे तेल हे आयुर्वेदिक व गुणकारी स्वरूपाचे असते.त्याचे अनेक फायदे आपल्या शरीराला कळत नकळत होत असतात. आपल्या दहा एक्कर सेंद्रिय करडईच्या उत्पादनातील आवश्यक तेवढी करडई आपण घरी वापरणार असून उर्वरित करडई गरजूंना आपण बाजारभावाने विकणार असल्याचे देखील भागवतराव म्हणाले.भेसळयुक्त तेलापासून आपला बचाव करण्यासाठी सेंद्रिय पद्धतीच्या करडई पासून काढलेले तेल वापरावे असे आवाहन देखील भागवतराव निर्मळ पाटील यांनी शेतकऱ्यांना केले.

# परळी पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी : सर्व प्रक्रिया पूर्ण करीत अवघ्या पाच तासात दोषारोपपत्र न्यायालयासमोर!

**सकाळी घडला गुन्हा, तात्काळ आरोपी अटक,दोन तासात परिपूर्ण तपास अन् पाच तासात चार्जशिटच केलं दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ मार्च**

एखादा गुन्हा घडल्यानंतर गुन्हा नोंदविण्याची तासन् तास चालणारी प्रक्रिया, त्यानंतर आरोपींना अटक करण्यात व त्यानंतर संपूर्ण तपासासाठी खूप मोठा कालावधी लागतो. त्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले जाते हा पोलीस प्रक्रियेतील नेहमीचा अनुभव आहे.




मात्र आज परळी शहर पोलिसांनी एका गुन्ह्यांमध्ये आश्चर्यकारक व अतिशय जलदगती कामगिरी करत सकाळी घडलेल्या गुन्ह्याची संपूर्ण प्रक्रिया व तपास पूर्ण करून अवघ्या पाच तासात या गुन्हय़ाचे दोषारोपपत्रच थेट न्यायालयात दाखल केले आहे. या कौतुकास्पद कामगिरीमुळे परळी शहर पोलिसांची सर्वत्र वाहवा होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,आज (दि. २८) रोजी परळी शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सकाळी साडेसहा वाजेच्या दरम्यान कडबा मार्केट वखार महामंडळाच्या मोकळ्या जागेतील झाडेझुडपे असलेल्या ठिकाणी महिलांना अतिशय लज्ञास्पद वाटणारा गुन्हा घडला आहे. मोकळ्या जागेतील झाडेझुडपे असलेल्या ठिकाणी प्रात:विधीसाठी काही महिला या गेलेल्या असताना त्या ठिकाणी एक आरोपी हा तिथे दबा धरून बसला होता. प्रात:विधीसाठी बसलेल्या महिलांच्या समोर जाऊन व महिलांना मनाला लज्ञास्पद वाटणारे वर्तन व अश्लील कृती त्याने केल्या.तसेच येणाऱ्या जाणाऱ्या महिलांना वाईट उद्देशाने इशारे केले. या बाबतची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली. त्यावरून गु र न ६७/२०२५ कलम - ७४,७५(२ ),७९ इछ्ड प्रमाणे सकाळी १०.३३ वाजता आरोपी भुजंग वाघमारे वय २८ वर्षे रा.रामनगर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन यांनी हे प्रकरण गांभीर्यपूर्वक घेऊन दाखल गुन्हातील आरोपीस तात्काळ ताब्यात घेतले. त्याचेकडे व साक्षीदारांकडे तपास करुन आरोपीविरुद्ध पुरावा मिळून आल्याने,वरिष्ठ कार्यालयाकडून कागदपत्राचे पडताळणी करून आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे, दोषारोप नंबर.३३/२५ सह कोर्टात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. न्यायालयात एस एस सी क्रमांक १५१/२५ दि.२८/३/२०२५ असा प्राप्त आहे. या गुन्ह्याचा तपास सपोनि योगेश शिंदे यांनी केला आहे. महिला विषयांच्या प्रकरणांमध्ये तात्काळ कारवाई करण्याचे वरीष्ठचे आदेश आहेत. त्यानुसार परळी पोलीसांनी जलदगती तपास करीत या गुन्ह्याचे दोषारोप अवघ्या पाच तासात न्यायालयासमोर सादर केले आहे. परळी पोलीसांनी अतिशय कौतुकास्पद कामगिरी केली असुन परळीत पहिल्यांदाच इतक्या जलदगतीने गुन्हा घडणे,नोंद होणे,आरोपी अटक, सखोल तपास, पुरावे अन्य प्रक्रिया,वरिष्ठांची पडताळणी आणि न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करणे ही प्रचंड वेळखाऊ प्रक्रिया अवघ्या पाच तासात पुर्ण झाल्याचे उदाहरण बघायला मिळाले आहे.

या प्रकरणात जलदगती तपासासाठी पोलीस अधीक्षक नवनीत, अप्पर पो. अधीक्षक श्रीमती चेतना, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे स्तरावर पो निरीक्षक रघुनाथ नाचन, सपोनि योगेश ,नितीन, मपोहे सविता, गोविन्द, किशोर पो. शि.पंडीत, रामकिशन रेडेवाड, धनश्री,वर्षा, यांनी कामगिरी केली. जलदगती तपास वेळेत पुर्ण करुन अवघ्या ०५ तासात दाखल गुन्ह्याचे दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले. याबद्दल परळी शहर पोलीसांचे कौतुक होत आहे.

# असंघटित क्षेत्रातील कामगारांनी ई श्रम पोर्टलवर ३१ मार्चपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ मार्च**

भारत सरकार कामगार आणि रोजगार मंत्रालय संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या हिताचे रक्षण आणि संरक्षण करून कल्याणाचा प्रचार आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करुन देशातील कामगार शक्तीचे जीवन आणि प्रतिष्ठा सुधारण्यासाठी सतत कार्यरत आहे. प्लॅटफॉर्म इकॉनॉमी हे भारतातील आणि जागतिक स्तरावरील एक उदयनमुख क्षेत्र आहे आणि अलीकडील काळात रोजगार निर्मितीचा एक महत्त्वाचा स्रोत बनला आहे.

देशातील भारत सरकार कामगार आणि रोजगार मंत्रालयाने २६ ऑगस्ट २०२१ रोजी देशातील असंघटित, स्थलांतरित कामगारांना युनिव्हर्सल अकाउंट नंबर (UAN) देऊन त्यांची नोंदणी करण्यासाठी ई श्रम पोर्टलवर नोंदीत झालेल्या असंघटीत, स्थलांतरित कामगारांना विविध सामाजिक सुरक्षा योजना एकाच ठिकाणी मिळण्यास मदत होणार आहे.

देशातील लाखो कर्मचारी प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्थेत काम करत आहेत ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालयाने ई श्रम पोर्टलवर प्लॅटफॉर्म कामगांराची व गिग कामगारांची नोंदणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे व तशी नोंदणीची सुविधा ई श्रम पोर्टलवर उपलब्ध करण्यात आलेली आहे. प्लॅटफॉर्म कामगार आणि ई श्रम पोर्टलवर नोंदणी केल्यास त्यांचा विविध कल्याणकारी योजनेत समावेश होईल व मोठ्या प्रमाणात असलेल्या ई श्रमशक्ती सुरक्षा प्रदान करणे केंद्र शासनास शक्य होईल. प्लॅटफॉर्म कामगारांमध्ये एग्रीगेटर्स हे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

एग्रीगेटर वरील वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे

राईड शेअरिंग सेवा, अन्न आणि किराणा मालवितरण सेवा, लॉजिस्टिक सेवा, वस्तू आणि किंवा सेवांच्या घाऊक, किरकोळ विक्रीसाठी (B2B/B2C) ई मार्केट ठिकाण (बाजाराचे ठिकाण आणि इंव्हेंटरी मॉडेल दोन्ही) व्यावसायिक सेवा प्रदाता, आरोग्यसेवा, प्रवास आणि आदरातिथ्य सामग्री आणि मीडिया सेवा, इतर कोणतीही वस्तू आणि सेवा प्रदाता प्लॅटफॉर्म. वर नमूद क्षेत्रातील एग्रीगेटर यांनी ई श्रम पोर्टलवर (www.eshram.gov.in) करण्याच्या सूचना विकास आयुक्त (असंघटित कामगार) महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिलेल्या आहेत. बीड जिल्ह्यात वर नमूद कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या एग्रीगेटर यांनी ई श्रम पोर्टलवर आपली नोंदणी दि. ३१ मार्च २०२५ पूर्वी करावी व आपली नोंदणी ई श्रम पोर्टलवर झाल्यानंतर आपणाकडे कार्यरत असलेल्या गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी यांनी केले आहे.

# शासकीय आर्थिक व्यवहारांकरिता ३० आणि ३१ मार्च रोजी भारतीय स्टेट बँक रात्री १२.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात येणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ मार्च**

बीड जिल्ह्यातील सन २०२४-२०२५ आर्थिक वर्षाचे शासकीय व्यवहार पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० मार्च २०२५ रोजी व दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी बीड कोषागार तसेच अधिनस्त सर्व उपकोषागार कार्यालय तसेच भारतीय स्टेट बँक व इतर सर्व शासकीय व्यवहार करणाऱ्या बँकेच्या शाखा रात्री १२.०० वाजेपर्यंत चालू ठेवण्याबाबत जिल्हाधिकारी बीड यांनी आदेशित केलेले आहे.

बीड जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी अचूक देयके कार्यालयीन वेळेत सादर करून दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत देयकाबाबतची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी, त्यानंतर सन २०२४-२०२५ चे आर्थिक व्यवहार बंद करून नवीन आर्थिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षाचे कामकाज सुरू करण्यात येईल याची बीड जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी लहू पाडुरंग गळगुंडे बीड यांनी केले आहे.